www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ५८ ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, रविवार, ७ जुलै २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### कसारा स्थानकाजवळ पंचवटी एक्स्प्रेसचं कपलिंग तुटलं, इंजिन डबे सोडून गेलं पुढं

● नाशिक, सचिन कदम :

मध्य रेल्वे मार्गावरील कसारा स्टेशनजवळ मनमाड-मुंबई पंचवटी एक्स्प्रेसची कपलिंग तुटल्याची घटना घडली. आज (6 जुलै) सकाळी घडलेल्या घटनेत एक्स्प्रेसची कपलिंग तुटल्यानं इंजिन आणि एक बोगी पुढं मुंबईच्या दिशेनं निघून गेली. काही अंतरावर जाऊन इंजिन आणि बोगी थांबली. इंजिन आणि एक बोगी पुढं गेल्यानं प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली.



### गडचिरोलीत सी 60 जवानांवर नक्षलवाद्यांचा हल्ला, दोन जवान जखमी

● गडचिरोली, नितीन देवळेकर :

धोडराज इथून अभियानावरुन परत येत असलेल्या सी-60 जवानांवर नक्षलवाद्यांनी IED स्फोटाचा अयशस्वी प्रयत्न केल्याची माहिती समोर आलीय. सी-60 चे जवान रस्त्यावर शोध मोहीम करत असताना धोडराज-भामरागड पुलाजवळ नक्षलवाद्यांनी लोखंडी क्लेमोरनं स्फोट केला. या घटनेत दोन जवानांच्या हाताला किरकोळ जखमा झाल्या आहेत. दरम्यान, जवानांच्या सतर्कतेमुळं नक्षलवाद्यांचा प्रयत्न हाणून पाडण्यात आला असून सदरील परिसरात पुढील शोध मोहीम सुरू आहे.

### देशाचा अर्थसंकल्प २३ जुलैला मांडला जाणार

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



तिसऱ्यांदा सत्तेत आलेल्या मोदी सरकारकडून येत्या २३ जुलैला अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. २२ जुलैपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होणार असून ते १२ जुलैपर्यंत चालणार असल्याची घोषणा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी केली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन या बजेट २०२४ सादर करणार आहेत. केंद्र सरकारच्या शिफारशीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली आहे. मोदी सरकारच्या तिसऱ्या टर्ममधील पहिल्या बजेटमध्ये काय काय असणार याबाबत अंदाज लावले जात आहेत. नोकरदार वर्गाला कराच्या आघाडीवर काही प्रमाणात दिलासा आणि सवलती मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, अंतरिम अर्थसंकल्पामुळे त्यांची काहीशी निराशा झाली होती. आता या अर्थसंकल्पात नोकरदार वर्गाला करात सूट मिळण्याची शक्यता आहे. एलपीजी सबसिडीची मुदत वाढविणे, विविध वस्तूंवरील कर कमी करणे, शेतकऱ्यांच्या निधीत ६००० वरून वर्षाला ८००० रुपयांची वाढ करणे आदी घोषणा केल्या जातील असा अंदाज आहे.

# महिनाभरात २१ नवजात बालकांचा मृत्यू

## बालकांचे वजन कमी असल्याचा कळवा रुग्णालय प्रशासनाचा दावा

● ठाणे, रोहित जैसवार :

महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात महिन्याभरात २१ नवजात बालके मरण पावल्याची माहिती समोर आली आहे. या नवजात बालकांचे वजन कमी असल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचा दावा रुग्णालय प्रशासनाने केला आहे.

कळवा रुग्णालयात लहान मुलांसाठी अतिदक्षता विभागात ३० खाटा आहेत. जून महिन्यात ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील ५१२ महिला प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. त्यातील ९० महिलांची प्रसूतीसाठी नोंदणी करण्यात आली होती. एकूण २९४ महिलांची सिझेरियन प्रसूती झाली. या प्रसूती झालेल्या महिलांच्या आठ नवजात बालकांचा ४८ तासांत मृत्यू झाला.

ठाणे ग्रामीण भागातील व पालघर जिल्ह्यातील गंभीर परिस्थिती असलेल्या महिला जून महिन्यात प्रसूतीसाठी




### उपाययोजना फोल?

मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात याच रुग्णालयात एकाच दिवशी १८ रुग्णांचा मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतर जाग आलेल्या पालिका प्रशासनाने रुग्णालयाचा ताण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या होत्या. आता एका महिन्यात २१ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्याने प्रशासनाच्या नवीन उपाययोजना फोल ठरल्या का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दाखल झाल्या होत्या. या महिलांच्या ९० नवजात बालकांचे वजन एक किलो वजनापेक्षा कमी होते. त्यामुळे मृत्यू झालेल्या २१ बालकांपैकी १९ बालके शहराबाहेरील होते. त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला असल्याचा दावा रुग्णालय प्रशासनाने केला आहे.





ठाणे - ठाण्यातील फ्लॉवर व्हॅली येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ठाणे शहर जिल्हा कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी दोन दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यावेळी महिलांनी मोठी गर्दी केली होती.

# खासदार रवींद्र वायकर यांना मुंबई पोलिसांची क्लीन चिट

## जोगेश्वरी भूखंड घोटाळ्यातून वायकर मुक्त

● मुंबई, विशाल कारंडे :

शिवसेना शिंदे गटाचे खासदार रवींद्र वायकर यांना मुंबई पोलिसांनी कथित जोगेश्वरी भूखंड घोटाळ्याप्रकरणी क्लीन चीट दिल्याची माहिती आता समोर आली आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं याबाबतचा सी समरी रिपोर्ट न्यायालयात सादर केला. या अहवालात मुंबई पोलिसांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेनं गैरसमजुतीतून रविंद्र वायकर यांच्या विरोधात तक्रार दिल्याचं म्हटलं आहे. हा सर्व प्रकार गैरसमजातून घडल्यानं आता रवींद्र वायकर यांच्यावरील गुन्हे मागं घेत असल्याचं मुंबई पोलिसांनी न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालात म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी साधारण डिसेंबर महिन्याच्या अखेरीस भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी रविंद्र वायकर यांच्यावर जोगेश्वरी इथं भूखंड घोटाळा केल्याचा आरोप केला. तेव्हा रवींद्र वायकर हे शिवसेना ठाकरे गटात होते. यात किरीट सोमय्या यांनी म्हटलं होतं की, "महाविकास आघाडी सरकारच्या



काळात सार्वजनिक वापरासाठीच्या भूखंडावर रवींद्र वायकर यांनी एक फाइव स्टार हॉटेल बांधण्याचा प्रयत्न केला.

पान २ वर

# भारतात वैद्यकीय उपचार जगभराच्या तुलनेत स्वस्त - देवेंद्र फडणवीस



● नागपूर, नितीन देवळेकर :

### सेमी कंडक्टर उत्पादीत करावे

"नागपूरात एकदा आलं की हे शहर तुम्हाला आकर्षित करते, आता सेमीकंडक्टर क्षेत्रात तुम्ही नागपूरात गुंतवणूक लवकरात लवकर करावी, याची आम्ही वाट पाहत आहोत. सेमीकंडक्टर फॅसिलिटीसाठी आम्ही बरीच जागा आरक्षित करुन ठेवली आहे. पुढील काळात या क्षेत्रारातील कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी अशी पॉलिसी करण्यात आली आहे, विशेष म्हणजे केंद्र सरकारने देखील याचं कौतुक केलं आहे, असे सांगत हॉरीबा कंपनीला फडणवीसांनी सेमी कंडक्टर उत्पादीत करण्याचं आवाहन केलं आहे. तर, हॉरीबा कंपनी सेमीकंडक्टरचं नागपुरात उत्पादन करणारी पहिली कंपनी असेल, असे म्हणत फडणवीसांनी भविष्यात नागपूरात होणाऱ्या मोठ्या गुंतवणुकीचे आणि रोजगार निर्मित्तीचे संकेत दिले आहेत.

कोरोना काळात भारताने स्वदेशी लस उत्पादन करत भारताची वैद्यकीय क्षेत्रातील ताकद जगाला दाखवून दिली. कोरोना महामारीवरील उपचाराचा डोस ठरलेली कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सीन या दोन्ही लसी भारतात उत्पादीत करण्यात आल्या. विशेष म्हणजे भारताने काही देशांना या लसींचा पुरवठाही केला. त्यामुळे, जगभरात भारताची वैद्यकीय क्षेत्रातील ताकद दिसून आली आहे. त्यातच, भारतातील सर्वात मोठे वैद्यकीय उपकरणे आणि हेमेटोलॉजी अभिकर्मक उत्पादन युनिटचे आज नागपूरात उद्धाटन करण्यात आले. यावेळी बोलताना, भारत देश जगाचं मेडीकल पर्यटन केंद्र बनतोय, या क्षेत्रात मोठी संधी असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. तसेच, भारतात वैद्यकीय उपचार जगभराच्या तुलनेत स्वस्त आहेत, असेही फडणवीस यांनी सांगितले.

पान २ वर

# शहरी वाहतुकीतील महिला सन्मान योजना सवलत

### पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते शुभारंभ

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :



महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या शहरी वाहतुकीत महिला सन्मान योजना सवलतीचा शुभारंभ व प्रवास करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते आज स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर नाट्यगृह येथे पार पडला.

यावेळी रत्नागिरी शहरी वाहतूक बसला पालकमंत्री श्री. सामंत यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून व श्रीफळ वाढवून बस रवाना करण्यात आली.

रत्नागिरी विभागातर्फे शहरी वाहतुकीत लागू करण्यात आलेल्या महिला सन्मान योजना - शहरी वाहतुकीत महिला प्रवाशांना प्रवास भाड्यात 50 टक्के सवलत, ज्येष्ठ नागरिक योजना- 65 ते 75 वर्षापर्यंतच्या ज्येष्ठ नागरिकांना शहरी वाहतूक प्रवास भाड्यात 50 टक्के सवलत. अमृत ज्येष्ठ नागरिक योजना - 75 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना अमृत ज्येष्ठ नागरिक या योजनेअंतर्गत शहरी वाहतूक प्रवास भाड्यात 100% मोफत प्रवास सवलत योजना चालू करण्यात आली.

पान २ वर

# महाराष्ट्र ठरले सर्वोत्कृष्ट कृषी राज्य

■ १५ व्या कृषी नेतृत्व समितीचा पुरस्कार जाहीर
■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वीकारणार पुरस्कार
■ पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षेसह विविध शाश्वत उपाययोजनांची दखल

● मुंबई, विशाल कारंडे :

१५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीचा २०२४ चा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर झाला आहे. भारताचे माजी मुख्य न्यायाधीश आणि केरळचे राज्यपाल न्यायमूर्ती पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखालील १५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने ही घोषणा केली आहे. नवी दिल्ली येथे १० जुलै रोजी होणाऱ्या सोहळयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हा पुरस्कार स्वीकारणार आहेत.

या पुरस्कारांसाठी समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेतली असल्याची माहिती राज्याच्या कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्यात बांबू लागवड, तृण धान्य- श्रीअन्न अभियान आणि औष्णिक वीज निर्मितीत बायोमासचा वापर अशी क्रांतिकारी पावले उचलली आहेत. या पावलांमुळेच हा प्रतिष्ठेच्या मानांकित पुरस्कारावर महाराष्ट्राचे नाव कोरले गेल्याचे श्री पटेल यांनी नमूद केले आहे.

हा पुरस्कार १० जुलै रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या १५ व्या कृषी नेतृत्व संमेलनात प्रदान केला जाईल. या संमेलनात केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान तसेच ब्राझील, अल्जेरिया, नेदरलँडचे राजदूत, महाराष्ट्र, यूपी, हरियाणा, हिमाचल प्रदेश, नागालँड या राज्याचे मंत्रीगण व इतर मान्यवर सहभागी होणार आहेत.



महाराष्ट्राला हा पुरस्कार मिळणे प्रतिष्ठेचे अत्यंत समाधानाचे असल्याचे नमूद करून श्री. पटेल म्हणाले, युनोचे सरचिटणीस अँण्टिवो गुट्रेस यांनी तापमान वाढीचे युग संपले आहे. आता होरपळीचे युग सुरु झाले आहे. आता तातडीच्या प्रयत्नांची गरज आहे, अशी जगातील कारभाऱ्यांना हाक दिली होती. या हाकेला प्रतिसाद देणारे आणि त्यावर गांभीर्याने पावले उचलणारे असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पहिले नेतृत्व आहे.

गुट्रेस यांनी दगडी कोळसा जाळणे थांबवा आणि वृक्षारोपणाची गती वाढवा असे आवाहन केले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने आता २१ लाख हेक्टरवर झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. तर दगडी कोळसा जाळणे कमी व्हावे यासाठी कोळश्या ऐवजी पाच टक्के बायोमास वापरण्याचा निर्देश देणारे श्री. शिंदे हे पहिलेच मुख्यमंत्री ठरले आहेत.

गुट्रेस यांचा मानव जात वाचवण्याच्या हाकेला संवेदनशीलतेने प्रतिसाद देणाऱ्या त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे मुख्यमंत्री म्हणून श्री. शिंदे यांची या पुरस्कारासाठी दखल घेतली गेली आहे. जगात नव्हे, किमान देशात तरी अशी क्रांतिकारी पावले उचलणारे खरोखरच आपल्या मुख्यमंत्री पदासोबतच पर्यावरण व वातावरणीय बदल खात्याचे निर्णय घेणारे श्री. शिंदे पहिले मुख्यमंत्री ठरले आहेत.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने अनेक परिवर्तनकारी निर्णय घेतले आहेत. यात २१ लाख हेक्टर क्षेत्रावर देशातील सर्वात मोठे बांबू मिशन राबविण्याचा निर्णय आहे.

पान २ वर

# नीट पेपरफुटी प्रकरण : ZP शिक्षकाच्या बँक खात्यात मोठी उलाढाल




### आरोपीला आणखी 2 दिवसांची सीबीआय कोठडी

● लातूर, सचिन कदम :

वैद्यकीय प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट प्रकरणातील लातूरमधील आरोपी जलील पठाण याला 14 दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तर, दुसरा आरोपी संजय जाधव यास दोन दिवसांची सीबीआय कोठडी देण्यात आली आहे. या महिन्यातील 2 तारखेला संजय जाधव आणि जलील पठाण या दोघांनाही 4 दिवसाची सीबीआय कोठडी देण्यात आली होती. त्यानंतर आज दोन्ही आरोपींना कोर्टामध्ये हजर करण्यात आले असता जलील पठाण यास 14 दिवसाची न्यायालयीन कोठडी तर संजय जाधव यास दोन दिवसाची सीबीआय कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलीस तपासात नवीन माहिती उघडकीस आली असून आरोपी गंगाधर दिल्ली नव्हे तर आंध्र प्रदेशात काम करत आहे. बंगळुरूतील सीबीआयच्या टीमने त्याला अटक केली आहे.

## संपादकीय

# अर्थव्यवस्थेतील उणे-अधिक

जेवढा भांडवली खर्चाचा वेग मंदावतो, त्या प्रमाणात त्याचा रोजगारावर प्रतिकूल परिणाम होतो. जेवढा रोजगार कमी, तेवढा लोकांच्या खिशात खुळखुळणारा पैसा कमी व त्यामुळे मागणीतच घट होते.

देशातील सर्वसामान्य जनता खर्च कशा रीतीने करते आहे, यावर अर्थव्यवस्थेची वाटचाल ही अवलंबून असते. एप्रिल आणि मे 2024 मध्ये निवडणुकांचा मौसम होता. त्याचा परिणाम झाल्यामुळे, केंद्र सरकारचे उपक्रम आणि कंपन्यांनी नेहमीपेक्षा एकतृतीयांश खर्च कमी केला. या काळात कंपन्यांचा भांडवली खर्च 96 हजार कोटी रुपयांनी घटला. भारतीय रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, ओएनजीसी, इंडियन ऑइल, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन या सर्वांच्या भांडवली खर्चात घट झाली. या कालावधीत सरकारी निर्णय प्रक्रिया रेंगाळते, त्याचप्रमाणे निवडणूक आचारसंहिता लागू असते. म्हणून खर्च करण्यावर मर्यादा येतात, हाही भाग आहे.

निवडणुकांचे निकाल लागून, केंद्र सरकार आता कामालाही लागले आहे. यंदा मान्सून वेळेवर दाखल झाला; परंतु त्याचे आगमन झाल्यानंतर मात्र मध्यंतरी काही दिवस पावसाने दगा दिला. जूनच्या अखेरीस पुन्हा एकदा पावसास सुरुवात झाली असून, फास्ट मूव्हिंग कन्झ्युमर गुड्स किंवा एफएमसीजी बाजारपेठेच्या दृष्टीने ही अत्यंत अनुकूल बाब आहे; परंतु ग्रामीण भागात मात्र अजूनही वस्तूंच्या किमती जास्त आहेत आणि वेतनपातळी घसरत चालली आहे, ही चिंतेचीच बाब आहे. 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी'च्या ताज्या आकडेवारीनुसार, फेब्रुवारी 2024 मध्ये संपलेल्या 27 महिन्यांमधील 25 महिन्यांत वास्तविक ग्रामीण वेतन (रियल रूरल वेज) कमी कमी झाले. उदाहरणार्थ, फेब्रुवारी 2024 मध्ये वास्तविक वेतनात 3.1 एक टक्का घट झाली. त्यापूर्वी सप्टेंबर 2022 मध्ये 2.9 टक्के अशी घट झाली होती.

भरीस भर म्हणून की काय, मे 2024 च्या अगोदरच्या 11 महिन्यांत शहरातील महागाईपेक्षा ग्रामीण महागाईचे प्रमाण अधिक होते. उदाहरणार्थ, आताच्या मे महिन्यात शहरातील भाववाढीचे सरासरी प्रमाण 1.10 टक्के होते, तर खेड्यापाड्यातील भाववाढ 5.3 टक्के इतकी होती. शिवाय शहरांपेक्षा खेड्यांमध्ये अन्नावरील खर्चाचे प्रमाण जास्त, म्हणजे 54 टक्के इतके असते. शहरांमध्ये हे प्रमाण 36 टक्के इतके असते. म्हणूनच अन्नधान्याची भाववाढ झाली, की त्याचा ग्रामीण भागात अधिक फटका बसतो. एफएमसीजी कंपन्यांची जवळपास 33 टक्के इतकी विक्री ग्रामीण भागात असते.

डाबर, हिंदुस्तान लिव्हर यासारख्या कंपन्यांचा 40 टक्के माल ग्रामीण भागात खपतो; परंतु तेथे वास्तविक वेतनवाढीचा वेग संथ झाल्यामुळे तुलनेने एफएमसीजी वस्तूंची मागणी कमी आहे. परंतु आता पुन्हा एकदा बर्यापैकी पाऊस पडू लागल्यामुळे, खरिपाचे उत्पादन चांगले येईल, अशी आशा निर्माण झाली आहे. शिवाय जानेवारी ते मार्च 2024 या कालावधीत शहरांपेक्षा खेड्यापाड्यातील मागणीमध्ये अधिक वाढ झाली होती. केंद्रीय कृषी खात्याने दिलेल्या माहितीनुसार, यंदा खरिपाच्या क्षेत्रात 32 टक्के वाढ आहे. याचा अर्थ, त्या प्रमाणात कृषी उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. अर्थात, जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर या महिन्यांत अपेक्षित पाऊस पडायला हवा.

सुदैवाने देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आणखीही काही चांगल्या गोष्टी घडत आहेत. चालू वर्षाच्या अखेरीपर्यंत देशातील माल आणि सेवा यांची एकूण निर्यात 800 अब्ज डॉलर्सवर जाईल, असा अंदाज आहे. 2022-23 मध्ये 776 अब्ज डॉलर्स आणि 2023-24 मध्ये 778 अब्ज डॉलर्स इतकी भारताने निर्यात केली. रशिया- युक्रेन युद्ध व इस्रायल-हमास यांच्यातील संघर्ष गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी झाला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय वाहतूक आणि दळणवळण यात गेल्या वर्षी इतके अडथळे आता नाहीत. चालू खात्यावरील तूटही कमी झाली आहे. मागच्या पाच वर्षांत भारतीयांचे विदेशी पर्यटनही साडेतीन पटींनी वाढले आहे.




## आजची चित्रोळी

बालपण झेपावतां
वार्धक्यात खुले कळी !
नात्यामध्यें बांधलेली
अशी संसार साखळीं !!

मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,
विक्रोळी, मुंबई

पान १ वरून...

### खासदार रवींद्र वायकर यांना मुंबई...

यातून जवळपास 500 कोटींचा घोटाळा वायकर यांनी केला," असा आरोप किरीट सोमय्या यांनी केला. रवींद्र वायकर यांच्या या प्रकारामुळं पालिकेचा महसूल बुडाल्याचं देखील किरीट सोमय्या यांनी म्हटलं होतं. किरीट सोमय्या यांच्या तक्रारीवरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अभियंता संतोष मांडवकर यांनी आझाद मैदान पोलीस स्थानकात तक्रार दिली. या प्रकरणावर आता मुंबई पोलिसांनी रवींद्र वायकर यांना क्लीन चिट दिली आहे.

कथित जोगेश्वरी भूखंड घोटाळा प्रकरणात रवींद्र वायकर यांच्या सोबतच खासदार वायकर यांच्या पत्नी मनीषा वायकर, आर्किटेक्ट अरुण दुबे, आसू नेहलानी, प्रीथपाल बिंद्रा, राज लालचंदानी यांना देखील सहआरोपी करण्यात आलं होतं. मात्र आता मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं या प्रकरणात रवींद्र वायकर यांना क्लीन चीट दिल्यानं या सर्वांवरील गुन्हे मागं घेत असल्याचं मुंबई पोलिसांनी न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालात म्हटलं आहे.

### भारतात वैद्यकीय उपचार जगभराच्या तुलनेत...

हॉरीबा' या वैद्यकीय क्षेत्रातील नावाजलेल्या कंपनीच्या फॅसिलीटी सेंटरचं आज औपचारीक उद्घाटन नागपुरात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याहस्ते करण्यात आलं. यावेळी बोलताना फडणवीस यांनी देशातील वाढत्या वैद्यकीय सुविधा आणि वैद्यकीय क्षेत्रातील संधीवर भाष्य केलं. भारत जगाचं मेडीकल पर्यटन केंद्र बनतोय, या क्षेत्रात मोठी संधी असल्याचे सांगत भारतात वैद्यकीय उपचार जगभराच्या तुलनेत स्वस्त आहेत, असेही फडणवीसांनी म्हटले. दरम्यान, भारतातील ग्रामीण भागात शासकीय रुग्णालयातून मोफत औषधोपचार होते, तर शहारातील महापालिका व सरकारी रुग्णालयातही मोठ्या आजारांवर मोफत उपचार केले जातात. मात्र, खासगी व मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात उपचारासाठी मोठा खर्च करावा लागतो. अनेकदा उपचाराचा खर्च परवडत नसल्याने रुग्णांवर वेळेत उपचार होत नाहीत, अशीही परिस्थिती उद्धभवल्याची अनेक उदाहरणे आहेत.

### शहरी वाहतुकीतील महिला सन्मान योजना...

यावेळी सिंधुरत्नचे निमंत्रित सदस्य किरण सामंत, जिल्हाधिकारी एम.देवेंदर सिंह, पोलीस अधिक्षक धनंजय कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रक्रांत सूर्यवंशी, प्रांताधिकारी जीवन देसाई, तहसीलदार राजाराम म्हात्रे, नगरपरिषद मुख्याधिकारी तुषार बाबर, रा.प. महामंडळाचे विभाग नियंत्रक प्रज्ञेश बोरसे व एस.टी. महामंडळ आगारातील अधिकारी उपस्थित होते.

रत्नागिरीचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मित्र मंडळामार्फत जिल्ह्यातील विद्यार्थिनींना पालकमंत्री श्री. सामंत यांच्या हस्ते अहिल्याबाई होळकर पासचे अर्ज व ओळखपत्र मोफत वितरण करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण वाहतुकीला लागू असलेल्या सवलत पालकमंत्री यांच्या प्रयत्नाने महामंडळाच्या रत्नागिरी विभागास लागू झालेली आहे. त्यामुळे शहर वाहतुकीला एक प्रकारची नवसंजीवनी प्राप्त झाली असून, रा. प. उत्पन्नात वाढ होऊन प्रवाशांना सुखकर प्रवास होण्यास मदत होणार आहे.

### महाराष्ट्र ठरले सर्वोत्कृष्ट कृषी राज्य...

यात नंदुरबार येथील धडगांव तालुक्यातील ७० गावच्या सरपंचांनी केंद्रीय फलोत्पादन सचिव प्रभातकूमार यांच्या समोरच आमचा प्रश्न बांबू लागवडीशिवाय सूटणार नाही, अशी मागणी केली. केंद्रानेही त्याला होकार दिला. या वर्षीच्या राज्याच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री पवार यांनी नंदूरबार जिल्ह्यातील एक लाख २० हजार एकर जमिनीमध्ये केंद्र आणि राज्य मिळून हरित पट्टा निर्माण करण्याचे जाहीर केले आहे. या अभियानासाठी अर्थमंत्री म्हणून उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी अर्थसंकल्पातही तरतूद केली आहे. याशिवाय सरकारने १२३ प्रकल्पांना मार्गी लावून सुमारे १७ लाख हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण करण्याचा चंग बांधला आहे.

नुकतात झालेल्या खरीप आढावा बैठकीत मायक्रो मिलेटचे उत्पादन वाढीसाठी पेरा आणि प्रत्यक्ष उत्पादन वाढीसाठी सर्व संबंधित यंत्रणांना आदेश दिले गेले आहेत. भारतातील पहिले मायक्रो मिलेट क्लस्टर लातूर जिल्ह्यात सुरु करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. तसा प्रस्तावही केंद्राकडे पाठवण्यात आला आहे.

पीएम किसान सन्मान निधी दुप्पट करण्याचा निर्णय घेणारे पहिले राज्य महाराष्ट्र ठरले आहे. याशिवाय लाखो शेतकऱ्यांना नॅनो-तंत्रज्ञान खतांचे वितरण करण्याची सुरवातही केली आहे. तृणधान्य अभियानात श्री अन्न म्हणून सावा, राळा-भुरका यांसह विविध तृणधान्यांना प्राधान्य देण्याचे धोरण तयार करण्यात आले आहे. त्यासाठी शंभर कोटी रुपयांची तरतूद करणारे महाराष्ट्र हे अव्वल राज्य ठरले आहे. या तृणधान्यांना एमएसपी देण्याचा निर्णयही महाराष्ट्राने घेतला आहे. नुकताच देशातील विविध सहा (महाराष्ट्रासह, राजस्थान, म.प्रदेश, गुजरात, गोवा आणि दमण) राज्यांच्या रब्बी पिकांच्या हमी भावाच्या शिफारशीकरिता मुंबईत केंद्रीय कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष विजयपाल शर्मा यांच्या समोर झाली. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच एका राज्याचे मुख्यमंत्री म्हणून श्री. शिंदे आणि कृषी मंत्री धनंजय मुंडे अशा बैठकीत उपस्थित राहिले. या दोघांनीही या बैठकीत ठोस अशी भूमिका मांडली. एमएसपी ठरवणाऱ्या बैठकीत आपल्या राज्याची भूमिका मांडणारे , सत्तर वर्षातील एकमेव मुख्यमंत्री म्हणून श्री. शिंदे यांचा उल्लेख केला जाईल. या शिवाय केंद्रीय कृषी मुल्य आयोगाच्या अध्यक्षांनी आयोगांची व्याप्ती वाढवण्यासाठी केंद्राला प्रस्ताव पाठविला जाईल, असे सुतोवाच केले. हे केवळ मुख्यमंत्री आणि कृषी मंत्र्यांच्या उपस्थितीमुळेच शक्य झाले आहे, असेही श्री. पटेल यांनी नमूद केले आहे. अन्न सुरक्षा आणि पर्यावरणाची काळजी या दोन्ही आघाड्यांवर महाराष्ट्र सरकार काम करत आहे.

# महाराष्ट्राला 'मार्वल' च्या माध्यमातून मिळणार आता कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा एआय हा सध्या तंत्रज्ञानातील सर्वात लोकप्रिय शब्दांपैकी एक झाला आहे. या तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक पद्धतीने केला तर मानवाचे जीवन सुकर होऊ शकते. याच उद्देशाने आता जगभर विविध क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झपाट्याने वाढत आहे. महाराष्ट्र पोलीस दलालाही आता 'मार्वल' कंपनीच्या स्थापनेमुळे गुन्ह्यांची उकल गतीने करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाली असून भविष्यात सर्वच क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी महाराष्ट्राला याचा मोठा लाभ मिळणार आहे.

मागील काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून अनेक नवकल्पना निर्मित होऊन प्रगती साधली जात आहे. अनेक वर्षांपूर्वी ज्या बाबी कल्पनेबाहेरच्या वाटत होत्या त्या वैज्ञानिक सिद्धांताद्वारे मान्य होऊन हळूहळू वास्तविकतेत रूपांतरित झाल्या. त्याचेच आजचे आधुनिक स्वरूप म्हणून आपण कृत्रिम बुद्धीमत्तेकडे पाहू शकतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मानवाप्रमाणे विचार करण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी तयार केलेल्या संगणकामधील मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण म्हणता येईल. शिकणे, तर्क करणे, समस्या सोडवणे, समज आणि भाषेचे आकलन ही सर्व या संगणकीय क्षमतांची उदाहरणे म्हणता येतील. संगणक, संगणक-नियंत्रित रोबोट किंवा सॉफ्टवेअर बनवण्याची एक पद्धत आहे जी मानवी मन आणि बुद्धिप्रमाणे विचार करते. मानवी मेंदूचा अभ्यास करून आणि माहितीचे विश्लेषण करून त्याचे परिणाम दर्शविते.

वास्तववादी आणि उच्च गुणवत्तेच्या प्रतिमा, व्हिडीओ आणि ऑडिओ तयार करण्यासाठी सुमारे एक दशकापूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर भारतात होऊ लागला. त्यासोबतच गुगल एआय, चॅट-जीपीटी आदी माध्यमातूनही याचा वापर वाढू लागला आहे. त्याचप्रमाणे सिरी किंवा अलेक्सा ही नावे सुद्धा परिचित झाली आहेत. या मशीन्स सुद्धा मर्यादित स्वरुपात कृत्रिम बुद्धिमत्तेचा भाग म्हणता येतील. मानवाप्रमाणे विचार करण्याची कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता सिद्ध होऊ लागली आहे. सध्या चॅटबॉट्सने जगात वादळ आणले आहे. कॉर्पोरेट क्षेत्रात डेटाचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले आहे. मोठमोठ्या कंपन्या दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी आणि कामगारांना मदत करण्यासाठी याची मदत घेत आहेत. मानवी आकलनशक्ती आणि तर्कावर आधारित निर्णय घेण्याच्या क्षमतेच्या जोरावर जटील समस्यांचे निराकरण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाऊ लागला आहे. गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलीस दलाला याचा मोठा लाभ होऊ शकणार आहे.

सद्यस्थितीत शासनाच्या विविध विभागांकडे प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध असते. पोलीस दलाकडे गुन्हे आणि गुन्हेगारांसंबंधी माहिती मोठ्या प्रमाणावर येत असते. सायबर आणि आर्थिक स्वरुपाच्या गुन्ह्यांच्या संख्येतही मोठी वाढ होत असून नागरिकांच्या फसवणुकीचे नवनवीन मार्ग अवलंबिले जात आहेत. यात गुन्ह्यांचे प्रकार आणि गुन्हेगारांची संख्या देखील मोठी असते. प्रत्येक बाबीत विविध प्रकारे मानवी मेंदूच्या क्षमतेचा वापर करून आणि उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून गुन्ह्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि या माहितीचा वापर करून विश्लेषण करायला आणि मनुष्याप्रमाणे निर्णय घ्यायला आधुनिक संगणकालाच शिकविले तर याचा मोठा लाभ होऊ शकतो. हाच धागा पकडून महाराष्ट्र पोलीस दलात एआयचा वापर करण्यासाठी स्पेशल पर्पज व्हेईकल स्थापन करून पोलीस दलाला या कृत्रिम बुद्धीमत्तेची मदत मिळवून देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने 16 मार्च 2024 च्या बैठकीत घेतला आणि त्या अनुषंगाने तातडीने पावले उचलून 'मार्वल' कंपनीची स्थापना करण्यात आली.



कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून गुप्तवार्ता क्षमता भक्कम करण्यासाठी आणि अपराधांचा पूर्वानुमान लावण्याची क्षमता वाढविण्यासाठी तसेच राज्य पोलीस दलास कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे यासाठी राज्यात 'Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement (MARVEL)' 'मार्वल' ही कंपनी स्थापन करण्यात आली आहे. कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये अशा प्रकारचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कंपनीस शासनामार्फत 4 कोटी 20 लाख रुपये प्रतीवर्ष याप्रमाणे पाच वर्षांकरिता 100 टक्के भागभांडवल देण्यात येणार असून भागभांडवलाचा पहिला हप्ता नुकताच वितरीत करण्यात आला आहे.

'मार्वल' स्थापन करण्याबाबत राज्य शासन, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर आणि मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. यांच्यात दि.22 मार्च 2024 रोजी त्रिपक्षीय करार करण्यात येऊन शासनाची ही कंपनी अधिनियम 2013 खाली नोंदणीकृत करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्यासमोर पोलीस जिमखाना येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत राज्याच्या मुख्य सचिव तथा गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक (अतिरिक्त कार्यभार), पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत याबाबतचे सादरीकरण करण्यात आले.


पोलीस दलाला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाल्याने मशीनला माहितीचे विश्लेषण करून आणि मानवाप्रमाणे विचार करायला शिकवून गुन्ह्यांची उकल करण्यासाठी तसेच होणारे गुन्हे रोखण्यासाठी मोठा लाभ होऊ शकेल. त्याचबरोबर गुन्हेगारांची गुन्हे करण्याची पद्धत जाणून, उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून कुठे गुन्हा घडू शकतो, कुठे कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते आदी बाबींचे अनुमान आधीच लावता येऊ शकणार आहे.

या उपक्रमातील मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. ही चेन्नई स्थित कंपनी असून त्यांना भारतीय नौदल, गुप्तवार्ता विभाग, आंध्र प्रदेश, आयकर विभाग, सेबी आदी संस्थांना एआय सोल्युशन्स पुरविण्याचा अनुभव आहे. त्याचबरोबर नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या विशेषज्ञतेचा उपयोग व्हावा या उद्देशाने 'मार्वल' चे कार्यालय नागपूर येथे भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या आवारात आहे. पोलीस दलाच्या मागणीनुसार 'पिनाका' एआय सोल्युशन्स पुरवेल तर, भारतीय व्यवस्थापन संस्था संशोधन आणि प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणार आहे. नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर चे संचालक हे या कंपनीचे पदसिद्ध संचालक असतील आणि मे.पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या.चे संचालक हे या कंपनीच्या संचालक मंडळावर असणार आहेत. तर नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक हे पदसिद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी असतील.

देशात नावलौकिक असणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलाची कार्यक्षमता कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापरामुळे आणखी वाढणार असून सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची उकल तातडीने होण्यासाठी हातभार लागेल, यात शंका नाही. 'मार्वल' थेट शासनाच्या गृह विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असणार आहे. त्यामुळे भविष्यात शासनाच्या इतर विभागांनाही कृत्रिम बुद्धीमत्तेचा लाभ मिळून महाराष्ट्र आणि पर्यायाने भारत देश विविध क्षेत्रात जगभरात अग्रेसर राहील, हे निश्चित.

**-ब्रिजकिशोर झंवर**
**वरिष्ठ सहायक संचालक**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय.**

# अभिनयातील भीष्माचार्य दिलीपकुमार



ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ७ जुलै २०२१ रोजी दिलीपकुमार यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ९८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीतच नव्हे तर संपूर्ण देशात शोककळा पसरली होती. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयाचे चालते बोलते विद्यापीठच हरपले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दिलीपकुमार यांचा जन्म ११ डिसेंबर १९२२ रोजी पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कॅंटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कॅंटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा... मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान - ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. दिलीपकुमार हे अभिनयातील भीष्माचार्यच होते. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)



ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात ठाण्याचे माजी नगराध्यक्ष स्वर्गीय नारायणराव गोविंद कोळी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना उपायुक्त जी.जी.गोदेपुरे, प्र.उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर, महापालिकेचे कर्मचारी आणि स्व. नारायणराव कोळी यांचे कुटुंबीय.

# गणेश नाईक यांच्या प्रयत्नाने अखेर विद्यार्थ्याला मिळाला न्याय

कल्याण : कल्याण पश्चिम येथील ब्रायटन वर्ल्ड स्कूलमधील दहावी उत्तीर्ण विद्यार्थी सुजित मच्छिंद्र राठोड याची दहावीची शैक्षणिक वर्षाची फी भरून सुद्धा गुणपत्रिका व शाळा सोडल्याचा दाखला दिला गेला नव्हता. कोविड काळातील मागील फी बाकी असल्याचे कारण सांगून विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळखंडोबा करणाऱ्या शाळेमध्ये रीतसर अर्ज देऊन सुद्धा व्यवस्थापनाकडून



कोणतेही सहकार्य न केल्याने, गणेश नाईक यांनी त्यांच्या या शाळेत सामाजिक कार्यकर्ते सहकाऱ्यांसमवेत ठिय्या आंदोलन करून गुणपत्रिका व शाळा सोडल्याचा दाखला विद्यार्थ्यास मिळवून दिला.

यावेळी खडकपाडा पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी सहकार्य केल्याने हा विषय लवकर मार्गी लागला. यावेळी पोलीस बॉईज ठाणे जिल्हा अध्यक्ष उमेश भारती, मनसेचे सतीश मोरे, राहुल काळे, देवेंद्र काळे, ईश्वर राठोड, अमोल राऊळ, प्रदीप चन्ने, लोकेश शिंदे व इतर सहकारी उपस्थित होते.

# डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये 'रोबोटिक थोरॅसिक सर्जरी सेंटर' सुरू

ठाणे/नवी मुंबई : महाराष्ट्राच्या आरोग्यसेवेला बळकटी देण्यासाठी डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, यांनी पुण्यातील पहिली आणि महाराष्ट्रातील दुसरी रोबोटिक थोरॅसिक सर्जरी सेंटर सुरु केले आहे. डॉ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ) आणि डॉ. अनीज बी. अहमद, संचालक आणि वरिष्ठ सल्लागार रोबोटिक थोरॅसिक सर्जरी, सिंगापूर यांच्या हस्ते या सेंटरचा शुभारंभ करण्यात आला आहे.

डॉ. यशराज पाटील, विश्वस्त व खजिनदार डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे, डॉ जे.एस. भवाळकर, डीन, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पुणे, डॉ. एच. एच. चव्हाण, वैद्यकीय अधीक्षक, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पुणे, डॉ. मनीषा करमरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे, डॉ. समीर चौहान, मिनिमल इनव्हेजीव्ह आणि रोबोटिक सर्जन जे कार्डिओ थोरॅसिक सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. अनुराग गर्ग, यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राचे नेतृत्व करतील. इत्यादी प्रमुख मान्यवरांसोबत ईतर वरिष्ठ मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.



या नव्याने सुरु करण्यात आलेल्या सेंटर मध्ये शरीरावर कोणत्याही प्रकारच्या चिरा न करता छोट्या छिद्राद्वारे थोरॅसिक सर्जरी करता येईल. ज्यामध्ये व्हिडिओ-असिस्टेड थोरॅसिक सर्जरी (VATS) आणि रोबोटिक-असिस्टेड थोरॅसिक सर्जरी (RATS) यांचा समावेश असेल ज्यामुळे फुफ्फुसातील ट्यूमर, छातीतील गाठ, आधीच्या आणि नंतरच्या मध्यवर्ती तयार होणाऱ्या गाठी आणि फुफ्फुसाचा बुलस रोग आणि थायमोमा यासह अनेक गुंतागुंतींवर उपचार करण्यास मदत करेल.

अशा प्रकारची शस्त्रक्रिया करण्यासाठी राज्यात किंबहुना देशामध्ये अनेक पारंपरिक अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी सुसज्ज सेंटर आहे जे काळानुरुप रुग्णहितासाठी या थोरॅसिक शस्त्रक्रियेकरीता केंद्राची आवश्यकता होती. डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे येथे सुरू करण्यात आलेले ह्या सेंटर मध्ये जागतिक दर्जाची रोबोटिक सर्जिकल सिस्टीम – प्रगत चौथ्या पिढीचे दा विंची एक्सआय उपलब्ध असून शस्त्रक्रिया करण्यासाठी वापरली जाईल, जी जगभरातील सर्वात प्रतिष्ठित आणि यशस्वी रेकॉर्ड असलेली स्थापित सर्जिकल रोबोटिक प्रणाली आहे.

रोबोटिक थोरॅसिक सर्जरी सेंटरच्या शुभारंभामुळे पुणे आणि आसपासच्या सातारा, सांगली, कोल्हापूर आणि नाशिकसारख्या शहरांतील रुग्णांना याचा फायदा होणार आहे. कारण, त्यांना यासाठी दुसऱ्या शहरांमध्ये किंवा राज्यांमध्ये न जाता या जागतिक दर्जाच्या उपचार सुविधेचा लाभ त्यांच्या जवळच्याच शहरात घेता येईल.

डॉ. पी.डी. पाटील, कुलपती डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे, म्हणाले, "आपल्या नागरिकांसाठी सर्वसमावेशक आरोग्यसेवा पायाभूत सुविधा असलेल्या आरोग्य सेवा पर्यटनासाठी पुणे हे एक प्रमुख ठिकाण म्हणून प्रस्थापित करण्याचे आमचे ध्येय आहे. ह्या सेंटरचे उदघाटन या वचनबद्धतेचा सन्मान करणारी आणि अत्याधुनिक रोबोटिक थोरॅसिक सर्जरी सेंटरची मागणी पूर्ण करणारी असून पुणे आणि शेजारील शहरातील नागरिकांना त्याचा फायदा होणारा आहे.

# माणकोली पुलाकडून डोंबिवलीत येणारी कोंडी सोडविण्यासाठी कडोंमपाचा वाहतूक आराखडा

कल्याण : डोंबिवलीतील मोठागाव रेतीबंदर येथील उल्हास खाडीवर नव्याने बांधण्यात आलेल्या माणकोली उड्डाण पुलावरून धावणाऱ्या वाहनांमुळे डोंबिवलीतील वाहन संख्या वाढू लागल्याने वाहतूक कोंडी वाढू लागली आहे. येत्या काळात माणकोली पुलावरून हलक्या वाहनांसह अवजड वाहने धाऊ लागली तर ही कोंडी वाढू शकते. हा विचार करून कल्याण डोंबिवली पालिकेच्या शहर अभियंता विभागाने डोंबिवली शहर परिसरासाठी वाहतूक सुसुत्रतेचा आराखडा तयार केला आहे.

आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून शहर अभियंता अनिता परदेशी, डोंबिवली विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज सांगळे यांनी या आराखड्याची रचना केली आहे. माणकोली पुलाचे



शासनाकडून अधिकृतपणे उद्घाटन झाले नाही. या पुलाची डोंबिवली बाजूकडील अनेक कामे, रेतीबंदर रेल्वे फाटकावरील उड्डाण पूल उभारणे बाकी आहे.

डोंबिवलीतून मुंबई, ठाणे येथे जाण्यासाठी माणकोली पूल कमी कालावधीचा मधला मार्ग असल्याने प्रवासी माणकोली पुलावरून जाण्यास पसंती देत आहेत. डोंबिवलीत एवढी वाहन संख्या सामावून घेण्याची क्षमता नसल्याने डोंबिवलीत वाहतूक कोंडी वाढू लागली आहे. माणकोली पूल पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर डोंबिवलीतून वाहन चालविणे अवघड होणार आहे. त्यामुळे शहर अभियंता अनिता परदेशी, कार्यकारी अभियंता मनोज सांगळे यांनी आयुक्त डॉ. जाखड यांच्या आदेशावरून डोंबिवलीसाठी वाहतूक सुससुत्रतेचा एका आराखडा तयार केला आहे.

या आराखड्याप्रमाणे डोंबिवलीत पश्चिमेत देवीचापाडा सातपूल भागात दिवा-वसई रेल्वे मार्गाखालून दोन स्वतंत्र बोगदे तयार करण्यात येणार आहेत. हे बोगदे टिटवाळा ते मोठागाव-काटई वर्तुळकार १८ मीटर रूदीच्या रस्त्यावर देवीचापाडा भागात असणार आहेत. हे बोगदे माणकोली पूल येथे डावे वळण घेऊन गणेशनगर, ठाकुर्ली, पत्रीपूलकडे धावणाऱ्या वाहनांसाठी सोयीस्कर आहेत. पत्रीपुलाकडून खंबाळपाडा, गणेशनगर, देवीचापाडा, मोठागावमार्गे माणकोली पुलाकडे या रस्त्याने वाहने डोंबिवलीतून न येता शहराबाहेरून येऊ शकतात, असे कार्यकारी अभियंता मनोज सांगळे यांनी सांगितले.

माणकोली पुलावरून उजवे वळण घेतल्यानंतर वाहने मोठागाव स्मशानभूी येथील १५ मीटरच्या पोहच रस्त्याने रेतीबंदर रेल्वे फाटकाकडे येणार आहेत. रेतीबंदर रेल्वे फाटकावरील उड्डाण पुलाचे काम रेल्वेकडून सुरू झाल्यानंतर या भागातील रस्ते वाहतूक बंद ठेवण्यात येईल. या कालावधीत माणकोली पुलावरून डोंबिवलीत येणारी वाहने जुनी डोंबिवली, कोपर येथील बोगद्यांमधून धावतील. या वाहनांना अडथळा नको म्हणून कोपर, जुनी डोंबिवलीतील काही रस्ते रूदीकरणाचा विचार प्रशासन करत आहे.

रेल्वे फाटकावरील उड्डाण पूल उभारून पूर्ण झाला की माणकोली पुलावर वाहने कोपर, जुनी डोंबिवली बोगदे, देवीचापाडा येथील दोन बोगदे आणि रेल्वे फाटकावरील पुलावरून अशा वेगळया पाच मार्गिकांमधून धावणार आहेत. वाहने वेगळया रस्त्याने धावणार असल्याने शहरात वाहन कोंडी होणार नाही, असे शहर अभियंता परदेशी यांनी सांगितले.

# श्रीराम मित्र मंडळाच्या वतीने 280 विद्यार्थ्यांना शैक्षणिक वह्या वाटप !

वासिंद - श्रीराम मित्र मंडळाच्या वतीने येथील सरस्वती विद्यालय व जिल्हा परिषद शाळेतील 280 विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले.

श्रीराम मित्र मंडळ हे गेल्या 24 वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य व सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देत असून दहाहंडी उत्सव, विविध आरोग्य शिबीर, गुणवंत विद्यार्थी सत्कार आदी उपक्रम राबवून गरजूंना नेहमी मदतीचा हात देत आहे. मंडळाचे अध्यक्ष अनिल मानिवडे व मंडळाचे सर्व पदाधिकारी, सदस्य यासाठी परिश्रम हाती घेत आहे.

या अनुषंगाने गुरुवार 4 जुलै रोजी मंडळाच्या वतीने सरस्वती विद्यालया मधील इयत्ता पाचवी ते दहावी च्या सुमारे अडीचशे तर जिल्हा परिषद शाळेमधील



सुमारे तीस असे एकूण दोनशे ऐंशी विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. तर मंडळाच्या वतीने गरीब-गरजू विद्यार्थ्यांसाठी 'दत्तक उपक्रम' राबविण्यात येणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष अनिल मानिवडे यांनी म्हटले.

या कार्यक्रमावेळी मंडळाचे जेष्ठ सल्लागार व मार्गदर्शक व्ही. एस. पाटील, अध्यक्ष अनिल मानिवडे, शांतकुमार लच्याने, सुपडू पाटील, चिंतामण पवार, डॉक्टर देशमुख, एन . एच.चौधरी, चंद्रकांत सोनार, कोंडीराम शेलार, भास्कर जाधव आदी पदाधिकारी होते.

सदर, कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाचे विजय तरणे, ओमकार शेलार, ऋषिकेश पांडव, अन्वय चौधरी, भुपेंद्र देवरे आदी सदस्य यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन मंडळाचे सदस्य मुकेश दामोदरे यांनी केले.



दिवा (सुचित शिंदे) - भाजप दिवा शहर महिला मोर्चा अध्यक्षा सौ. सपना रोशन भगत यांच्या प्रयत्नांना अखेर यश आलेच .जनसेवा हे एक मात्र ध्येय डोळ्यासमोर ठेवून सौ सपना रोशन भगत यांनी दिवा पोलिस स्टेशन मध्ये महिलांच्या समस्या जाणून घ्यायला तसेच महिला आपल्या काही समस्या पुरुष पोलिसांना सांगण्यास संकोच करतात त्यासाठी महिला पोलिस असाव्यात म्हणून स्वत: लक्ष्य घालून ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांना दिनांक ४ जुलै २०२४ रोजी निवेदन पत्र दिले होते आणि त्याची दखल घेऊन ठाणे पोलिस आयुक्तांनी तातडीने अंमलबजावणी करुन दोन महिला पोलिस दिवा पोलिस स्टेशनला दिले आहेत. त्याबद्दल सौ. सपना रोशन भगत यांनी ठाणे पोलिस आयुक्तांचे आभार मानले आहे.

तसेच सौ. सपना रोशन भगत यांनी स्वत: आज दिवा पोलिस स्टेशनला भेट देऊन रुजू झालेल्या महिला पोलिसांना शुभेच्छा देऊन दिवा पोलिस स्टेशनचे ए.पी.आय श्री अमोल कोळेकर साहेबांचेही आभार मानले.

# ई-ऑफिस कार्यप्रणाली जलद गतीने कार्यान्वित करण्यावर नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचा भर

**लोकाभिमुख प्रशासन राबविणे हा प्राधान्यक्रम ठेवून महानगरपालिकेचे कार्यालयीन कामकाज गतीमान व पारदर्शक करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने ई-ऑफिस कार्यप्रणाली जलद गतीने कार्यान्वित करण्यावर भर दिला जात आहे.**

नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिकेची कार्यप्रणाली पूर्णत: डिजीटल व्हावी यादृष्टीने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी गतीमान पावले उचलली असून ई – ऑफिस कार्यप्रणाली ऑगस्ट महिन्यात कार्यान्वित करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत. ई-ऑफिस कार्यप्रणाली व ईआरपी मॉडयूल यांच्या कार्यवाहीबाबत आढावा बैठकीमध्ये आयुक्तांनी हे निर्देश दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता श्री.शिरीष आरदवाड, प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री. शरद पवार व संबंधित विभागप्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

ई-ऑफिस कार्यप्रणालीमध्ये 82 विभागांचा समावेश असणार असून त्यासाठी आवश्यक संबंधित कर्मचाऱ्यांचा ई-डाटा संकलित करण्याची कार्यवाही 7 दिवसात पूर्ण करावी असे निर्देशित करीत याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागांच्या विभागप्रमुखांची असेल




असे आयुक्तांनी स्पष्ट केले. ही कार्यप्रणाली वापरताना त्याकरिता कर्मचाऱ्यांचे शासकीय ई-मेल आयडी उपलब्ध् करुन घ्यावेत असेही त्यांनी निर्देशित केले. ही कार्यप्रणाली राबविण्यासाठी अभियांत्रिकी विभागात स्वतंत्र संगणक कक्ष स्थापित करण्यात येणार असून त्याठिकाणी मोठया आकाराची स्कॅनिंग उपकरणे ठेवून स्कॅनिंग सुविधा कार्यान्वित करावी असे निर्देश आयुक्तांनी दिले. ऑगस्ट महिन्याच्या प्रारंभापासून ई-ऑफिस कार्यप्रणाली सुरु होईल हे उद्दीष्ट ठेवून संबंधित कर्मचाऱ्यांचे माहिती संकलन, त्यांची ई-मेल आयडी निर्मिती, त्यांचे आवश्यक प्रशिक्षण या बाबी पूर्ण करुन घ्याव्यात अशा स्पष्ट सूचना आयुक्तांनी दिल्या.

ई-ऑफिस कार्यप्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर ई-टपाल कार्यप्रणालीही राबविणेबाबत कार्यवाही करण्याचे आयुक्तांनी यावेळी सूचित केले.

या ई-ऑफिस कार्यप्रणालीमुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या कामकाजात अधिक गतीमानता आणि पारदर्शकता येणार असून त्यामुळे नागरिकांना विहीत वेळेत दर्जेदार सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीला अधिक सुनियोजितपणा येणार आहे. अशाच प्रकारे महानगरपालिकेच्या लोकसेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीचाही सविस्तर आढावा आयुक्तांनी घेतला. यामध्ये परवानगी व प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी नागरिक ज्या ज्या सेवांकरीता महानगरपालिकेकडे अर्ज करतात अशा सर्व सेवा त्यांना ऑनलाईन उपलब्ध करुन दयाव्यात असे निर्देश आयुक्तांनी दिले. याव्दारे नागरिकांचे महानगरपालिकेच्या कार्यालयात येण्याचे श्रम, मूल्य व वेळ वाचावेत ही भूमिका आयुक्तांनी मांडली.

मालमत्ता कर भरणा करण्याची पेमेंट गेट वे सुविधा तत्परतेने कार्यान्वित करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले. आगामी काळात देण्यात येणारी मालमत्ता कराची देयके लिडार सर्वेक्षणानुसार प्राप्त माहितीप्रमाणे देण्यात यावीत असेही आयुक्तांनी निर्देश दिले.

ई - ऑफीस कार्यप्रणालीमुळे अधिका-यांच्या टेबलवरील फायलींचा ढिगारा कमी होईल तसेच ऑनलाईन पद्धतीने फाईल तयार होत असल्यामुळे ती कोणत्या अधिका-याकडे किती दिवसांपासून प्रलंबित आहे हे वरिष्ठ अधिका-यांना समजेल. त्यामुळे प्रत्येक अधिका-याला विहित मुदतीत फाईलवर निर्णय घेणे बंधनकारक होणार आहे. कागदपत्रांचे स्कॅनिंग होणार असल्यामुळे फाईल गहाळ होणे किंवा एखादा कागद गायब होणे अशा घटना घडणार नाहीत व कामकाजामध्ये सूसुत्रपणा येईल.

# कांदा खाणं बंद केलं तर शरीरावर काय होऊ शकतो परिणाम ?



जगभरात अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ तयार केले जातात. या सर्वांमध्ये कांद्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो; कारण कांदा हा अन्नातील महत्त्वाचा घटक आहे. कांदा जेवणात वापरल्यानं त्याची चव दुप्पट होते, असं तज्ज्ञांच मत आहे. विशेषतः भाज्यांमध्ये याचा वापर केला जातो. आपण रोज जे काही बनवतो, मग ती भाजी असो, बिर्याणी असो किंवा स्नॅक्स असो, त्यात कांदा टाकला जातो यात शंका नाही.

कांद्यामध्ये असतात हे घटक : तुम्ही महिनाभर कांदा खाणं बंद केलं तर काय होईल? कांदा टाळणं शरीरासाठी चांगलं की वाईट? आम्हाला कळू द्या. कांदा शरीर निरोगी ठेवतो, महिनाभर कांदा पूर्णपणे टाळल्यानं बद्धकोष्ठतेपासून दृष्टीपर्यंत अनेक समस्या उद्‌भवू शकतात. वरिष्ठ आहारतज्ज्ञांच्या मते, कांद्यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. हे शरीर निरोगी ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. यामध्ये व्हिटॅमिन-सी, व्हिटॅमिन-बी6 मोठ्या प्रमाणात आढळतात आणि यासोबतच फोलेटमुळे रोगप्रतिकारक शक्ती, पेशींची वाढ आणि पचनक्रिया व्यवस्थित राहते. ऍलिसिन आणि क्वेर्सेटिन सारख्या दाहक-विरोधी गुणधर्मांबरोबरच, अँटीऑक्सिडंट आणि कर्करोगविरोधी गुणधर्म देखील कांद्यामध्ये आढळतात. ते ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करण्यास आणि जुनाट आजारांचा धोका कमी करण्यास मदत करतात.

कांदा टाळल्यास या समस्या उद्‌भवतात : महिनाभर कांद्यापासून दूर राहिल्यास काय होईल, महिनाभर कांदा खाणे बंद केलं तर शरीरात मोठे बदल होणार नाहीत; परंतु काही छोटे बदल नक्कीच होतील, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. कांद्यामध्ये फायबर जास्त प्रमाणात असते, जे निरोगी पचनसंस्थेसाठी आवश्यक असते. त्यामुळे ते टाळल्यास अपचन तसेच बद्धकोष्ठता सारख्या समस्या निर्माण होऊ शकतात.

कांदा टाळण्याऐवजी मर्यादित प्रमाणात खा : याशिवाय कांदा न खाल्ल्याने व्हिटॅमिन-सी, व्हिटॅमिन-बी 6 आणि फोलेट तसेच मँगनीज आणि पोटॅशियमसारख्या खनिजांची कमतरता होते; ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. परिणामी, शरीरात थकवा वाढतो. लाल रक्तपेशी तयार होतात आणि रक्त गोठण्यासारखे प्रतिकूल परिणाम होतात. त्यामुळे कांदा पूर्णपणे टाळण्याऐवजी तो मर्यादित प्रमाणात खाणं योग्य ठरेल, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

महत्त्वाची सूचना : या वेबसाइटवर तुम्हाला दिलेली सर्व आरोग्य माहिती, वैद्यकीय टिप्स आणि सूचना केवळ तुमच्या माहितीसाठी आहेत. आम्ही ही माहिती वैज्ञानिक संशोधन, अभ्यास, वैद्यकीय आणि आरोग्य व्यावसायिक सल्ल्यांवर आधारित देत आहोत; परंतु या माहितीचं अवलंबन करण्यापूर्वी तुम्ही तुमच्या वैयक्तिक डॉक्टरांचा सल्ला घेणं उत्तम ठरेल.

## गुलाबी बांधणी लेहंगा, त्यावर सोन्याच्या तारेचे नक्षीकाम, नवरीबाई राधिका मर्चंटच्या लुकची चर्चा!



गुलाबी रंगाच्या या लेहंग्यावर सुंदर असे नक्षीकाम केलेले असून त्यावर दुर्गा मातेचे श्लोक आहेत. हे श्लोक काढण्यासाठी सोन्याची तार वापरण्यात आलेली आहे. हा लेहंगा तयार करण्यासाठी 35 मीटरचे बंधेज (एका प्रकारचे रेशमी वस्त्र) वापरण्यात आले आहे.

## आकडी येण्याचं कारण काय? रुग्णांनी अशी घ्यावी काळजी



आकडी येणं म्हणजेच एपिलेप्सी, ज्याला फिट येणे, फेफरे, मिरगी, अपस्मार ही सुद्धा नावं आहेत. वेगवेगळ्या वयोगटांत आकडी येण्याची कारणंही भिन्न असतात. लहान मुलांच्या मेंदुचा विकास योग्य पद्धतीने न झाल्यास आकडी येण्याची समस्या उद्भवू शकते. तर वयस्क माणसांना अतिविचार, ब्रेन ट्यूमर या कारणांमुळे फिट येते. शिवाय त्यामागे अनुवांशिक कारणेही असतात. साधारणत: फिट येणं किंवा आकडी येणं ही एक मेंदूची व्याधी आहे, आणि उपचारांनी ही व्याधी व्यवस्थित आटोक्यात राहू शकते. असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. आकडी येणं ही एक कॉमन समस्या आहे. या आजारामध्ये रुग्णाला कोणतीही पूर्वकल्पना न येता झटका येतो. त्यामुळे रुग्ण आपली शुद्ध हरपून बसतो. आकडी येणाऱ्या रुग्णाला यामुळे असंख्य अडचणींचा सामना काराव लागतो. बऱ्याचदा आकडी आलेल्या माणसाची दातखिळी देखील बसते. तसेच शुद्ध हरपल्यामुळे तो रुग्ण जमिनीवर कोसळतो. अशा घटना आपल्या कानावर आल्यात असतील. त्यामुळे आकडी येणाऱ्या रुग्णाकडे कायम लक्ष ठेवून राहावं लागतं. एखाद्या व्यक्तीला आकडी आल्यास ती व्यक्ती लगेचच बेशुद्ध पडते, त्वचा सुन्न पडणे ,शरीरात झटका येणे,विचार करण्याची क्षमता कमी होणे, तोंडाला फेस येणे प्रामुख्याने आकडी येण्याची ही मुख्य लक्षणे आहेत.

## ख्रिस्तियानो रोनाल्डोचं स्वप्न भंगलं; फ्रान्सकडून पोर्तुगाल पराभूत

फुटबॉल जगतातील नामवंत खेळाडू आणि पोर्तुगालचा आधारस्तंभ असलेल्या ख्रिस्तियानो रोनाल्डोला आपल्या शेवटच्या युरो चषकात संघाला यश मिळवून देता आलेले नाही. फ्रान्सविरुद्ध झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत पोर्तुगालचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ५-३ने पराभव झाला. किलियन एम्बापेच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या फ्रान्सचा उपांत्य फेरीचा मार्ग सुकर झाला असून आता ते स्पेनशी भिडणार आहेत. जर्मनीच्या हॅम्बर्ग शहरातील फोक्सपार्कस्टेडियन मैदानात पोर्तुगाल विरुद्ध फ्रान्स हा बहुचर्चित सामना पार पडला. निर्धारीत वेळेत दोन्ही संघाना एकही गोल करता आला नाही. त्यामुळे पेनल्टी शूटआऊट करून सामन्याचा निकाल जाहिर झाला.

दरम्यान स्पेननेही यजमान जर्मनीचा पराभव करत मोठ्या दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला आहे.





पोर्तुगाल विरुद्ध फ्रान्स या सामन्याला युरो २०१६ चषकाच्या अंतिम सामन्याची पार्श्वभूमी होती. २०१६ रोजी पोर्तुगालने फ्रान्सला अंतिम सामन्यात एका गोलने नमवले होते. त्या पराभवाची परतफेड आता किलियन एम्बापेच्या नेतृत्वाखाली फ्रान्सने केली आहे.

युरो चषकाच्या सुरुवातीपासून पोर्तुगाल आणि फ्रान्स हे विजयाचे दावेदार समजले जात होते. परंतु पोर्तुगालला जगज्जेत्यांप्रमाणे खेळ करता आलेला नाही. पहिल्या दोन सामन्यात विजय मिळविल्यानंतर जॉर्जिया आणि स्लोव्हेनियाविरुद्धच्या सामन्यात पोर्तुगालच्या संघाला एकही गोल करता आला नाही. उपांत्यपूर्व फेरीतही हाच कित्ता गिरवला गेला.

उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात काय झालं?

१२० मिनिटांच्या खेळात दोन्ही संघापैकी एकालाही गोल करता आला नाही.अतिरिक्त वेळेत दोन्ही संघानी बचावात्मक पवित्रा घेतल्यामुळे त्या वेळेतही गोल झाला नाही. त्यानंतर पेनल्टी शूटआऊट करण्याचा निर्णय झाला. पोर्तुगालकडून तीन गोल करण्यात आले. मात्र बाकीचे खेळाडू गोलकिपरला भेदण्या

## दिनविशेष

**घटना**

१९८५ : बोरिस बेकर - हे विम्बल्डन पुरुष एकेरीचे विजेतपद १७ व्या वर्षी मिळवणारे सर्वात तरुण खेळाडू बनले.
१९७८ : सॉलोमन बेट - देशाला इंग्लंडकडून स्वातंत्र्य मिळाले.
१९४१ : दुसरे महायुद्ध - अमेरिकन सैन्याचे आइसलँडमधे आगमन झाले.
१९१०: भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे स्थापना.
१८९८ : हवाई बेटांनी अमेरिकेचे सार्वभौमत्व मान्य केले.
१८९६ : मुंबईच्या फोर्ट भागातील एस्प्लनेड मॅन्शन या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील वॉटसन हॉटेलमध्ये ऑगस्ते लुई या ल्युनिअर
बंधूंनी भारतात पहिल्यांदाच चित्रपट दाखवला.
१८५४ : कावसजीदावर यांनी मुंबईत कापड गिरणी सुरू केली.
१७९९ : रणजितसिंहच्या सैन्याने लाहोरला वेढा घातला.
१५४३ : फ्रेन्च सैन्याने लक्झेंबर्गचा ताबा घेतला.
१४५६: जोन ऑफ आर्कला यांना निधनाच्या २५ वर्षांनंतर निर्दोष ठरवले.

**जन्म**

१९८१: महेंद्रसिंग धोनी - भारतीय क्रिकेटपटू पद्म भूषण, पद्मश्री, ध्यानचंद खेलरत्न
१९७३ : कैलाश खेर - भारतीय गायक-गीतकार आणि दिग्दर्शक - पद्मश्री
१९७० : मिस्टर पटेल - भारतीय क्रिकेटपटू
१९६२: पद्म जाफेणाणी गायिका
१९४८: पद्मा चव्हाण - चित्रपट रंगभूमीवरील अभिनेत्री (निधन : १२ सप्टेंबर १९९६)
१९४७ : नरेश राजेग्यानेंद्र - नेपाळ
१९२६: आनंद मोहन झुत्शी गुलजार देहलावी - उर्दू कवी, अभ्यासक आणि पत्रकार (निधन: १२ जून २०२०)

**निधन**

२०२१ : दिलीप कुमार भारतीय सुप्रसिद्ध अभिनेते पद्म विभूषण, पद्म भूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार (जन्म: ११ डिसेंबर १९२२)
२०१४ : एडवर्ड शेवर्डनाडझे जॉर्जिया देशाचे २रे अध्यक्ष (जन्म: २५ जानेवारी १९२८)
१९९९: कॅप्टन विक्रम बात्रा - कारगिल युद्धातील शहीद अधिकारी परमवीरचक्र (जन्म: ९ सप्टेंबर १९७४)
१९८२: बॉन महाराजा - भारतीय गुरू आणि धार्मिक लेखक (जन्म: २३ मार्च १९०१)
१९७१ : अनब्लॉक आय्ब्रेक्स मिकी माऊसचे सहनिर्माते (जन्म: २४ मार्च १९०१ )
१९७० : ऍलन लेन- पेंग्विन बुक्सचे संस्थापक (जन्म: २१ सप्टेंबर १९०२)

## नानांची सुरेल बाजू संगीतप्रेमींच्या भेटीला, सागरिका म्युझिकच्या गाण्यांसाठी बजावली गीतकाराची भूमिका

आजवर अभिनेता-दिग्दर्शक आणि शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या नानांची सुरेल बाजू संगीत प्रेमींसमोर येणार आहे. कारण संगीत क्षेत्रात 25 वर्षे पूर्ण केल्याचं औचित्य साधत सागरिका म्युझिकडून नानाछंद या अल्बमचे अनावरण करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे या अल्बममधील गाणी नाना पाटेकर यांनी शब्दबद्ध केली आहेत. तसेच वर्षानुवर्षे स्मरणात राहणारं ठरेल वैशाली सामंत, राहुल देशपांडे आणि स्वप्नील बांदोडकर या तीन सर्वोत्कृष्ट गायकांच्या आवाजात ही गाणी रसिकांना ऐकायला मिळणार आहेत.

'नानाछंद' या अल्बममधील गाणी नाना पाटेकर यांनी लिहिली असून, संगीतकार नीलेश मोहरीर यांनी संगीतबद्ध केली आहेत. या अल्बमची मांडणी-निर्मिती विक्रम बाम यांनी केली आहे. वरद कठापूरकर, सचिन भांगरे, विनायक नेटके आणि इतर प्रतिभावान संगीतकारांनी वादन केलं आहे. अवधूत वाडकर, तुषार पंडित आणि अजिंक्य धापरे रेकॉर्डिंग आणि मिक्स इंजिनिअर आहेत.

नाना पाटेकरांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना



म्हटलं की, 'मी निसर्गात जास्त रमतो. त्यामुळे त्या सगळयाशी माझी खूप जवळीक आहे. अनेकदा ते शब्द आपसूक ओठावर येतात. त्या शब्दांना निलेशने अतिशय मेहनतीने सुरांमध्ये गुंफलंय त्यातूनच ही गीत निर्मिती झाली. सागरिका म्युझिक आणि सागरिका बाम यांनी या गीतांना सुंदरतेने एका अल्बमच्या माध्यमातून प्रकाशित केलं आहे. याचा अतिशय आनंद मला आहे.'

या सोहळ्याला ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकर, ज्येष्ठ गायिका उत्तरा केळकर गायक सुदेश भोसले यांनीही हजेरी लावली होती. तसेच त्यांनी सागरिका म्युझिकला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देखील दिल्या. भारतातील विविध भाषांमध्ये संगीत तयार करण्यासाठी समर्पित संगीत लेबल तयार करून तरुण आणि प्रतिभावान गायक-संगीतकारांसाठी हक्काचं व्यासपीठ तयार करणं ही सागरिका म्युझिकच्या प्रवासातील पुढली महत्त्वाची पायरी ठरली.

मागील काही वर्षांमध्ये सागरिकाने हिंदी, मराठी, बंगाली आणि इंग्रजीमध्ये 11,000 हून अधिक ट्रॅक्सची निर्मिती आणि विपणन केलं आहे. 300 हून अधिक संगीत व्हिडिओ आणि डिजिटल कलाकृती, मुलांसाठी 100 ॲनिमेटेड चित्रपट आणि यशस्वी संगीतावर आधारित लाईव्ह टेलिव्हिजन कलाकृती तयार केल्या आहेत. आजवर सागरिका म्युझिकच्या माध्यमातून उस्ताद रशीद खान, पं. अजय चक्रवर्ती, पं. हरिप्रसाद चौरसिया, पं. शिवकुमार शर्मा, जसराज, सुरेश वाडकर, स्वप्नील बांदोडकर, वैशाली सामंत, अवधूत गुप्ते, अजय-अतुल, शंकर महादेवन, श्रेया घोषाल, महालक्ष्मी अय्यर, विजयप्रकाश, सचिन पिळगावकर, आदर्श शिंदे, अनुप जलोटा, शान, कुमार सानू, बिक्रम घोष अशा बऱ्याच दिग्गजांनी आपली कला संगीत प्रेमींपर्यंत पोहोचवली आहे.

## राशि भविष्य

**मेष** पुन्हा ऊर्जा मिळविण्यासाठी संपूर्ण विश्रांती घ्या. व्यापाऱ्यांना आज व्यापारात घाटा होऊ शकतो आणि आपल्या व्यवहारला उत्तम बनवण्यासाठी तुम्हाला पैसा खर्च लागू शकतो. अभ्यासाच्यावेळी देखील बाहेरील उपक्रमांत भाग घेण्याचा अतिरेक केल्याने पालकांच्या रोषास कारणीभूत व्हावे लागेल. करिअर नियोजन हे खेळाइतकेच महत्त्वाचे आहे.

**वृषभ** काही ठिकाणी तुम्हाला जबरदस्त माघार घ्यावी लागू शकेल. पण त्यामुळे तुम्ही कोसळून न जाता, अपेक्षित ध्येयासाठी कठोर परिश्रम घ्या. ही माघार तुम्ही खुणेच्या दगडाप्रमाणे लक्षात ठेवा. या कठीण प्रसंगी नातेवाईक देखील तुम्हास मदत करतील. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला महत्त्वाच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील.

**मिथुन** आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. आज तुम्ही धन संबंधाने जोडलेल्या समस्यांच्या कारणाने चिंतीत राहू शकतात यासाठी तुम्हाला आपल्या कुठल्या विश्वासपात्रचा सल्ला घेतला पाहिजे. आपल्या कुटुंबाला पर्याप्त वेळ द्या. तुम्ही त्यांची काळजी करता हे त्यांना जाणवू द्या. तुमचा चांगला वेळ त्यांच्याबरोबर व्यतीत करा.

**कर्क** तुमच्या विनोदबुद्धीमुळे तुम्ही एखाद्या व्यक्तीला विनोदबुद्धी अंगी बाणवण्यासाठी उद्युक्त कराल. कारण तुम्ही त्या व्यक्तीला सांगाल की आनंद हा वस्तूंच्या मालकीमध्ये नसतो तर तो तुमच्या आतमध्ये दडलेला असतो. आपल्यासाठी पैसा वाचवण्याची इच्छा पूर्ण होऊ शकते.

**सिंह** थोडासा व्यायाम करून तुमचा दिवस सुरू करा - त्यामुळे तुमचे तुम्हालाच चांगले वाटेल - दररोज अशा प्रकारे दिवसाची सुरूवात करा. काही महत्त्वाच्या योजना मार्गी लागल्यामुळे आपणास नव्याने अर्थसहाय्य उपलब्ध होईल. कुटुंबातील सदस्यांना आपल्या जीवनात विशेष स्थान असेल.

**कन्या** आयुष्याबद्दल उदार दृष्टीकोन तयार करा. आपल्या परिस्थितीबद्दल जगण्याबद्दल तक्रारी करुन उदास होण्यात काहीही अर्थ नाही. अशा प्रकारचे लाचार निराश विचार, जगण्यातील मजा आणि आयुष्याकडूनच्या आशा अपेक्षा उद्‌ध्वस्त करुन टाकतात. कोणतीही गुंतवणूक घाईगडबडीत करू नका.

**तूळ** तंदुरुस्ती आणि वजन घटविण्याचे उपक्रम आपल्या शरीरास चांगला आकार देण्यासाठी उपयोगी ठरतील. आज तुम्हाला व्यर्थ खर्च करण्यापासून स्वतःला थांबवले पाहिजे अथवा गरजेच्या वेळी तुमच्या जवळ पैश्याची कमतरता होऊ शकते. तुमचे व्यक्तिमत्व आणि मोहक आकर्षकता यामुळे काही नवे मित्र जोडाल.

**वृश्चिक** इतरांबरोबर आनंद वाटून घेण्याने आपले आरोग्य बहरून जाईल. तुमचा पैसा तेव्हाच कामाला येईल जेव्हा तुम्ही त्याला संचित कराल ही गोष्ट योग्य प्रकारे जाणून घ्या अथवा येणाऱ्या काळात पश्चाताप करावा लागेल. तुमच्या खेळकर-खोडकर स्वभावामुळे अवतीभवतीचे वातावरण प्रसन्न बनेल.

**धनु** तुमची प्रकृती सुधारा आणि चांगले आयुष्य जगण्यासाठी संपूर्ण व्यक्तिमत्व बदलण्याचा प्रयत्न करा. कुणी जवळच्या नातेवाइकाच्या मदतीने आज तुम्ही आपल्या व्यवसायात उत्तम प्रगती करू शकतात ज्यामुळे तुम्हाला आर्थिक लाभ ही होईल. नातेवाईक/मित्रमंडळी अचानक संध्याकाळी तुमच्या घरी अवतरतील आणि धमाल उडवून देतील.

**मकर** आपल्या भांडकुदळ स्वभावावर नियंत्रण ठेवा, अन्यथा आपल्या नातेसंबंधाना धक्का बसू शकतो. खुल्या मनाने विचार करणे आणि कोणाही बद्दलचे पूर्वग्रह सोडून देण्याने आपल्या या स्वभावावर मात करू शकता.

**कुंभ** तुमची शारिरीक क्षमता कायम राखण्यासाठी तुम्ही क्रीडा प्रकारांसाठी वेळ खर्च करण्याची शक्यता आहे. भाऊ बहिणींच्या मदतीने आज तुम्हाला आर्थिक लाभ मिळू शकेल. भाऊ बहिणीचा सल्ला घ्या. मित्रांकडून सायंकाळी एखादा रोमांचक प्लॅन आखल्यामुळे आजचा दिवस खूपच सुंदर असेल.

**मीन** तुमची उच्च कोटी ऊर्जा आज चांगल्या कामासाठी वापरा. तुमच्या अवास्तव नियोजनामुळे निधीची कमतरता भासेल. शेजा-याशी झालेल्या भांडणामुळे तुमचा मूड खराब होईल. परंतु, तुमच्या रागावर नियंत्रण मिळवा कारण त्यामुळे आगीत तेल ओतले जाईल.

# सातारा शहराच्या प्रवेशद्वारा नजीक रस्त्यावर जल अभिषेक

सातारा : लोकशाहीमध्ये काही लाडक्या नेत्यांबद्दल निष्ठा असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे सातारकर नागरिक लोकप्रतिनिधीच्या प्रेमापोटी अनेक गोष्टी आत्मसात करतात. कधी कधी भाग्यविधाते, जलनायक व युवकांचे आयडॉल अशी उपाधी देतात. अशा नेत्यांच्या कर्तबगारीने सध्या सातारा प्रवेशद्वारा रस्त्यावरच नैसर्गिक जल अभिषेक होत आहे . त्याने वाहन चालकांसोबत सर्वांनीच समाधान व्यक्त केले आहे.

याबाबत माहिती अशी की, दुष्काळी भागातील लोकांना पाणी दिसत नाही. त्यामुळे त्यांना नेहमीच संघर्ष करावा लागतो. पण, सातारा शहरात त्या प्रवेशद्वारा नजीक दुष्काळी भागातील लोक येतात. चक्क रस्त्यावर जलाभिषेक पाहून सातारकर नागरिक खूप नशीबवान आहेत. असा ते दुवा देतात. त्याचे कारण म्हणजे सातारा- कोरेगाव, सातारा- खटाव ,सातारा- माण तालुक्याकडे जाण्यासाठी हा रस्ता आहे. या रस्त्याची



अवस्था नेहमीच चर्चेत येते. आता तर चक्क राष्ट्रीय महामार्ग नजीकच जल अभिषेक होत असल्याने अनेक भक्तांना नवल वाटत आहे. राजकीय व्यक्तींनी एखादा अपशब्द वापरला तर त्याचा निषेध करण्यासाठी काही सत्ताधारी मंडळी याच रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करून निषेध व्यक्त करतात. पण ,आता त्यांच्या डोळयावर काळी पट्टी लावण्यात आलेली आहे. हे सुद्धा जनता पाहत आहे.

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव ,माण, खटाव या दुष्काळी भागात जर असे लोकप्रतिनिधी असतील तर कधीही दुष्काळ पडणार नाही. कारण, नेत्यांचे जल अभिषेकासाठी बारकाईने लक्ष असते. हे साताऱ्यातच दिसून येत आहे. धन्य ते नेते... धन्य ते कार्यकर्ते... व धन्य ती जनता... असे आता सोलापूर जिल्ह्यातील साताऱ्यात येणारे प्रवासी बोलू लागले आहे. असे कर्तव्यदक्ष काम होण्यासाठी चार आमदार व एक खासदार आणि असंख्य भक्त पाठीशी असावे लागतात. एवढेच नव्हे तर याबाबत संबंधित विभागाचे उत्कृष्ट काम करणारे पुरस्कार प्राप्त प्रशासकीय अधिकाऱ्यांचे खूप मोठे योगदान आहे. त्यांनाही धन्यवाद दिल्याशिवाय वाहन चालक पुढे जात नाही. मुळातच या राष्ट्रीय महामार्गावरील पुलाला श्रद्धास्थान श्रीमंत छत्रपती घराण्यातील व्यक्तीचे नाव देऊन त्यांच्यासारखे कार्य करता येत नाही. याचीच कबुली या जलाभिषेकामुळे दिली आहे.

हा स्थानिक राज्यकर्त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे.हे सुद्धा अभ्यासू व जाणकार व्यक्तीने लक्षात ठेवावे. बडे बडे शहरो मे छोटे छोटे हादसे होते है/ असाच हादसा मानून गप्प बसावे. अशी विनंती अनेकांनी केलेली आहे.

# संघर्षातून मिळवलेल्या यशातूनच उच्च शिखर गाठता येतो - सोमनाथ घार्गे

## जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

अलिबाग - रायगड जिल्ह्यातील यशस्वी स्पर्धा परीक्षा केंद्र स्पर्धा विश्व अकॅडमी, अलिबाग या ठिकाणी रायगड जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांना जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे स्पर्धा परीक्षा व पोलीस भरती मार्गदर्शन कार्यक्रम नुकताच पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मा.सोमनाथ घार्गे- जिल्हा पोलीस अधीक्षक रायगड, वंदना आंब्रे-प्रोफेसर ज्युनिअर कॉलेज जा.र.ह.कन्याशाळा, अलिबाग यांचे सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सदर कार्यक्रमांमध्ये सन्माननीय पोलीस अधीक्षक यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आपला शाळेतील विद्यार्थी ते MPSC वर्ग एक अधिकारी असा संघर्षमय प्रवास सांगितला. नैसर्गिक आपत्तीमुळे आलेल्या आर्थिक समस्येमुळे आपल्याला कसे शिक्षण मधून




थांबवावे लागले व तिथून आयुष्याला मिळालेली कलाटणी तथा एमपीएससीच्या माध्यमातून निवड होई पर्यंत त्यांना ज्या संघर्षमय प्रवासातून जावे लागले हे सांगितले. संघर्षाचा सामना प्रत्येकाला करावाच लागतो परंतु हार न मानता जे ठरवले ते प्राप्त करण्यासाठी आपण कठोर मेहनत, सातत्य व जिद्दीने उभे राहिले पाहिजे मग आपल्याला यशाच्या उंच शिखरावर पोहोचता येते. स्पर्धा विश्व अकॅडमी तसेच विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या तपस्वी गोंधळी व सुचिता साळवी यांच्या माध्यमातून रायगड अलिबाग मध्ये हे स्पर्धा परीक्षांचे क्लासेस होत आहेत आणि त्यांच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी वेगवेगळ्या डिपार्टमेंट मध्ये काम करत आहेत हे कौतुकास्पद आहे. जो जिद्द हरत नाही तो कायम यशस्वी होतो. बऱ्याचदा स्पर्धा परीक्षांचा अनुभव नसलेले लोक आपल्याला भेटतात आणि स्पर्धा परीक्षेतील अपयशाबद्दल बोलतात; अनिश्चिती बद्दल सांगतात त्यामुळे घाबरून न जाता आपण जे करतोय ते जर बरोबर असेल तर चालत रहा असे प्रतिपादन याप्रसंगी त्यांनी केले. विविध उदाहरणातून कशाप्रकारे ते स्वतः आणि त्यांच्या समूहातील त्यांचे मित्र वेगवेगळया उच्च पदांवर निवडले गेले याचा संघर्षमय प्रवास त्यांनी सांगितला. याच बरोबर आता स्पर्धा परीक्षांचे वातावरण उत्तम आहे विद्यार्थ्यांना फक्त मेहनत घेण्याची आवश्यकता आहे, अपयशाला न घाबरता, एकदा अपयश आलं तरी पुढे आपण अभ्यास सुरू ठेवला पाहिजे. काही वेळेस अपयश आपल्याला काही तरी मोठे मिळवण्यासाठी मदत करू शकते असे त्यांनी सांगितले जसे तुम्ही जर एखाद्या परीक्षेत अपयशी झालात तर पुढल्या वेळेस जास्त जिद्दीने, मेहनतीने अभ्यास करून आणखी मोठे पद आपण मिळवू शकतो.

आपला जास्तीत-जास्त वेळ हा अभ्यासाला द्या, ग्रुप स्टडी महत्त्वाचा असतो, पुस्तकांचं वाचन जास्तीत-जास्त करणे गरजेचे आहे, सतत सराव केला पाहिजे. ग्रुप डिस्कशन वर भर द्या यश हे मिळेलच असे देखील ते म्हणाले. जा.र.ह. कन्या शाळा ज्युनिअर कॉलेजच्या प्रोफेसर वंदना आंब्रे यांनी देखील उपस्थित बहुसंख्य विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा देताना आपण काय काळजी घेतली पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तपस्वी गोंधळी यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सुचिता साळवी यांनी केले. सदर कार्यक्रमाला चेंढरे ग्रामपंचायतच्या सदस्या प्रणिता म्हात्रे, स्पर्धा विश्व अकॅडमीचे किरण साळवी आदी मान्यवर व रायगड जिल्ह्यातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# "भुजबळांचे ऐकून मराठ्यांवर अन्याय केला तर 288 पैकी एकही निवडून येऊ देणार नाही

## मनोज जरांगेंचा सरकारला थेट इशारा

हिंगोली : एकट्या छगन भुजबळांचे ऐकून तुम्ही जर मराठ्यांवर अन्याय केला तर याद राखा. महाराष्ट्राचे आरक्षण छगन भुजबळांची मक्तेदारी नाही. छगन भुजबळांचे ऐकून जर मराठ्यांवर अन्याय करण्याचा प्रयत्न केला तर 288 पैकी एकही उमेदवार सरकारचा निवडून येऊ देणार नाही, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आज हिंगोलीतून शांतता रॅलीला सुरुवात केली आहे. या रॅलीतून त्यांनी जोरदार टीकास्त्र डागले आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आज मन भरून आले आहे. तुमच्या चरणी नतमस्तक होतो. हिंगोलीच्या मराठ्यांनी मराठ्यांची शान राखली आहे. ज्या ज्या वेळी मराठ्यांवर संकट येतील, त्या त्या वेळेस हिंगोली जिल्हा ताकदीने उभा राहील. माझं राज्य सरकारला जाहीर सांगणे आहे की, मराठा समाजाचा हा आक्रोश आहे. मराठा समाज स्वतःच्या न्यायासाठी रस्त्यावर



आलाय. एकट्या छगन भुजबळचे ऐकून तुम्ही जर मराठ्यांवर अन्याय केला तर याद राखा. महाराष्ट्राचे आरक्षण छगन भुजबळांची मक्तेदारी नाही. छगन भुजबळांचे ऐकून जर मराठ्यांवर अन्याय करण्याचा प्रयत्न केला तर 288 पैकी एकही उमेदवार सरकारचा निवडून येऊ देणार नाही. सरकारने आता शहाणपणाची भूमिका घेणे गरजेचे आहे. राज्य सरकारला माझी विनंती आहे की, आक्रोश समजून घ्या. आज कानाकोपऱ्यात भगवे वादळ दिसत आहे. छगन भुजबळचे ऐकून त्रास दिला तर तुम्हाला पुन्हा त्रास होईल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

ते पुढे म्हणाले की, मला राजकारणात जायचं नाही. मराठ्यांना आरक्षण मिळावं. करोडो मराठा समाजाचे लेकर मोठी झाली पाहिजेत. मराठा कुणबी एकच आहेत. सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या. सरसकट आरक्षण द्यायचं ही जबाबदारी तुमची आहे. सगेसोयरेची अंमलबजावणी करायची आणि टिकवायची जबाबादारी तुमची आहे. माळी समाजाला आरक्षण दिलं. बाकीच्या जाती पोट जाती म्हणून घातल्या. विदर्भातील मराठ्यांचा व्यवसाय शेती आहे. महाराष्ट्रातील मराठ्यांचा व्यवसाय शेती आहे. आमचा व्यवसाय आणि जात एकच आहे. मराठ्यांची पोट जात कुणबी होत नाही का? शाहू महाराजांनी आरक्षण दिलं. पश्चिम महाराष्ट्रातील सगळं मराठा कुणबी आहेत. 57 लाख नोंदी सापडल्याचे लेखी दिलं आहे. त्यांच्या नातेवाईकांना प्रमाणपत्र का देत नाहीत?, असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

# Rahul Gandhi 'Deeply Shocked' at BSP Leader's 'Abhorrent' Killing

New Delhi: Congress MP Rahul Gandhi on Saturday condemned the tragic killing of the Bahujan Samaj Party (BSP) chief of the Tamil Nadu unit, stating that the state government will ensure culprits are brought to justice expeditiously. K Armstrong, was hacked to death by a group of unidentified men near his residence in Perambur in Chennai on July 5.



Taking to 'X', Gandhi wrote, "Deeply shocked by the brutal and abhorrent killing of Thiru Armstrong, the Tamil Nadu Chief of the Bahujan Samaj Party. My heartfelt condolences go out to his family, friends and followers." He emphasized that the Tamil Nadu Congress leaders are in constant touch with the state government.


"Tamil Nadu Congress leaders are in constant touch with the government of Tamil Nadu, and I am confident that the government will ensure that the culprits are brought to justice expeditiously," stated the Congress MP. The ruling Dravida Munnetra Kazhagam (DMK) in Tamil Nadu and the Congress are allies in the INDIA bloc.

Meanwhile, the Chennai police have secured eight suspects so far and formed a special team to investigate the murder of the BSP leader. Tamil Nadu Chief Minister MK Stalin also expressed grief over the incident and paid condolences to the family of the slain leader.

# भटके, विमुक्तांना आता ओळखपत्र व वास्तव्याचा पुराव्याविना मिळणार शिधापत्रिका - मंत्री छगन भुजबळ

मुंबई - भटके, विमुक्त जमातींकडे ओळखपत्र व वास्तव्याचा पुरावा नसल्याने त्यांना शिधापत्रिका मिळण्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून राज्यातील भटके विमुक्त जमातींना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी त्यांना शिधापत्रिका मिळण्यासाठी ओळखपत्र व वास्तव्याचा पुराव्याची अट शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत शासन निर्णय देखील निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे भटके, विमुक्त जमातींतील बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यातील भटके विमुक्त समाजाच्या नागरिकांना सर्वसामान्य जनतेप्रमाणे शिधापत्रिका वितरित करताना कागदोपत्री अडचणींचा सामना करावा लागतो. राज्यातील भटके विमुक्त समाजाचा व्यक्ती हा समाजाचा घटक असून त्यांनाही सन्मानाने जगण्याचा व शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मुलभूत अधिकार आहे. ही बाब विचारात घेता राज्यातील भटक्या विमुक्त समाजाच्या नागरिकांना नवीन शिधापत्रिका मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा सहानभूतीपूर्वक विचार करून त्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्यासाठी




सुलभ कार्यपध्दती अनुसरून त्यांना पात्रतेनुसार योग्य ती शिधापत्रिका देऊन त्यावरील अनुज्ञेय लाभ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यासाठी नवीन शिधापत्रिकेसाठी २९.०६.२०१३ अन्वये निश्चित केलेल्या प्रचलित पध्दतीनुसार आवश्यक असलेले पुरावे सादर करण्यामध्ये राज्यातील भटके विमुक्त समाजाच्या नागरिकांना येणाऱ्या अडचणींचा सहानभुतीपूर्वक विचार करून त्यांना ओळखीचा पुरावा व वास्तव्याचा पुरावा सादर करण्याबाबत सूट देण्यात आली आहे.

भटक्या विमुक्त समाजाच्या नागरिकांकडून नवीन शिधापत्रिकासाठी अर्ज भरून घेऊन त्यांना शिधापत्रिका वितरित करण्यासाठी सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी विशेष मोहिमेचे आयोजन करावे. मोहिमेंतर्गत भटक्या विमुक्त समाजाच्या नागरिकांना अनुज्ञेय शिधापत्रिका वितरित करून त्यावरील लाभ देण्यात यावेत असे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयांनुसार भटक्या विमुक्त समाजाच्या नागरिकांना नवीन शिधापत्रिका मिळण्यासाठी मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नोंदणी झाल्याने प्राप्त झालेले मतदार ओळखपत्र, सामाजिक न्याय विभागाच्या जिल्हा समाजकल्याण अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या राजपत्रित अधिकाऱ्याचे भटक्या विमुक्त समाजाच्या नागरिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र, रहिवासासंदर्भात शहरी भागात नगरसेवक व ग्रामीण भागात सरपंच/उपसरपंचांचे त्या भागातील रहिवाशी प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे. यापैकी कोणतेही कागदपत्र व आधारकार्ड उपलब्ध नसल्यास अर्जदाराकडून स्वयंघोषणापत्र भरुन घेण्यात येणार आहे.

# Andhra CM To Hold Meeting With His Telangana Counterpart On Bifurcation Issues

Hyderabad: Andhra Pradesh Chief Minister N Chandrababu Naidu and his Telangana counterpart A Revanth Reddy will chair a meeting to resolve pending issues related to the bifurcation of undivided Andhra. The meeting will be held at the government's Mahatma Jyoti Rao Phule Praja Bhavan on Saturday evening.





On June 2, 2014, Telangana was formed and carved out of Andhra Pradesh. A decade after separation, multiple issues, such as the bifurcation of assets, state-run institutions, power bill dues, and the transfer of leftover employees to their native states, are still unresolved between the two states.

Hyderabad ceased to be the common capital for both states from June 2 this year as per the Andhra Pradesh Reorganisation Act, 2014, and the metropolis is now the capital city of Telangana only.

The division of various state-run institutions and corporations of the undivided state, listed in Schedule 9 and Schedule 10 of the Andhra Pradesh Reorganisation Act (2014), between the two states, has not been completed as there was no consensus over several issues, officials confirmed.

Opposition BRS leaders demanded that the Telangana government press for the return of some villages from Andhra to Telangana, which were merged with Andhra at the time of bifurcation to facilitate the construction of the multi-purpose Polavaram project.

Following this, CM Naidu wrote a letter to the Telangana chief minister last week, proposing a face-to-face meeting on July 6 to address unresolved bifurcation issues. On the other hand, Revanth Reddy welcomed Naidu's proposal and invited him for a 'tete-e-tete'.

Meanwhile, former Andhra Pradesh Chief Minister Y S Jagan Mohan Reddy also met the then Telangana Chief Minister K Chandrasekhar Rao in 2020. Before that, Naidu and KCR held a meeting during the TDP chief's previous tenure as Andhra chief minister between 2014 and 2019. Rao also attended the foundation-laying ceremony of Andhra's capital, Amaravati, then.

# Shiv Sena Leader Sandeep Thapar Attacked with Swords by Three Unknown Persons in Ludhiana

Ludhiana (Punjab): Punjab Shiv Sena leader Sandeep Thapar was attacked by three unknown persons with a sword in Ludhiana on Friday, according to the police. According to the Deputy Commissioner of Police Ludhiana, Jaskaran Singh Teja, the Punjab Shiv Sena Leader, was attacked on Friday at around 11:30 am.



"Around 11:30 am, three unknown persons attacked Sandeep Thapar with a sword. He got injured and is under treatment in the hospital...He is out of danger...The accused have been identified and they will be arrested soon," DCP Ludhiana said. After the incident, the police issued an alert in the entire area and arrested two accused, Sarabjit Singh and Harjot Singh, in connection with the case.

"We had got instructions from DGP, CP Ludhiana and an alert was issued in the entire area...The two accused, who were wanted, were arrested near the university area. An alert has been issued to arrest the third accused as well. Both the arrested accused, Sarabjit Singh and Harjot Singh, are residents of Ludhiana. They have been handed over to Ludhiana Police," SSP Fatehgarh Sahib Ravjot Grewal said.

The third suspect, Tahal Singh, involved in the attack on the Punjab Shiv Sena leader is still at large. "We have arrested two accused, Sarabjit Singh and Harjot Singh. Another accused Tahal Singh is still wanted. Further investigation is underway," CP Police Ludhiana, Kuldeep Singh Chahal, said. Further investigation is underway.


# महिला स्वयंरोजगारासाठीच्या ई-पिंक रिक्षा योजनेचा विस्तार; प्रत्येक जिल्ह्यात 500 ई-रिक्षा, जिल्हा वार्षिक योजनेतून निधी - उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई, प्रतिनिधी:

राज्य सरकारचा पारदर्शक प्रशासनावर भर असल्याचे सांगताना उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार म्हणाले की, लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती, मुख्यमंत्री - माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना अप्रेंटीसशिपसाठी देण्यात येणारा स्टायपेंड, मुलींना उच्च व व्यावसायिक शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती, अन्नपूर्णा योजनेंतर्गत तीन मोफत सिलेंडरसाठीचे अनुदान, शेतकऱ्यांसाठी देण्यात येणारे अनुदानही डीबीटीमार्फत थेट त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे. लाभार्थ्यांना लाभ देत असताना त्यात कोणताही भ्रष्टाचार होऊ नये, यासाठी या योजनांचा शंभर टक्के निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याने लाभार्थ्यालाच त्याचा लाभ मिळेल, यावर शासनाचा भर असल्याचा दृढविश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, जिल्ह्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने जिल्हा वार्षिक योजना बळकट झाल्या पाहिजेत, असा सातत्याने प्रयत्न असतो. यासंदर्भात वेळोवेळी आढावा बैठका घेतल्या आहेत. वर्ष 2024-25 मध्ये जिल्हा वार्षिक योजनेसाठी 20 टक्क्यांची वाढ केलेली आहे. त्यासाठी 18 हजार 165 कोटी रुपयांचा नियतव्यय दिलेला आहे.

अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देत असताना केलेल्या नवीन



राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी यापूर्वी जाहीर करण्यात आलेल्या योजनांसह नवीन योजनांच्या अंमलबजावणीसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. महिलांना स्वयंरोजगारासाठी ई-पिंक रिक्षा योजनेचा विस्तार, श्री ज्योतिबा मंदिर व परिसर विकास उत्कर्ष प्राधिकरणाची स्थापना, जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज यांचे समाधीस्थळ असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे विकास आराखडा तयार करुन त्यास आवश्यक निधी देण्यात येत आहे. यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद येथील शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेस दोन कोटींचा निधी, जावळी तालुक्यातील शहीद तुकाराम ओंबाळे स्मारकास निधी, कोयना येथील पुनावळे येथे जलपर्यटनासाठी निधी देण्यात येणार आहे, अशा घोषणा उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेला विधानसभेत उत्तर देताना केल्या.

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्याचा सर्वांगीण विकास व्हावा, प्रत्येक समाजघटकाला विकासाच्या प्रवाहात संधी मिळावी, शेतकरी, शेतमजूर, महिला, युवा, सर्वसामान्य नागरिक अशा सर्वांच्या अडचणी दूर व्हाव्यात, ही राज्य शासनाची इच्छा आहे. प्रत्येक समाजघटकाला न्याय देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून केला आहे. महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य आहे.

कल्याणकारी राज्याची संकल्पना राबवत असताना आर्थिक आघाडीवर देखील राज्य सुस्थितीत रहावे, यासाठी सरकारचा प्रयत्न आहे. या सर्व गोष्टी नजरेसमोर ठेऊन अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. त्यामुळे वारकरी, महिला, शेतकरी, दुर्बल घटक, युवा पिढी या सर्वांचा हा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांना बळ देणारा, महिलांना सक्षम करणारा, हा अर्थसंकल्प आहे, असे त्यांनी सांगितले.

घोषणांबाबत अधिक माहिती देताना उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, अंतरिम अर्थसंकल्पात महिलांसाठी स्वयंरोजगार निर्मिती तसेच सुरक्षित प्रवासासाठी 10 हजार खरेदीसाठी "पिंक ई-रिक्षा" योजनेची घोषणा केली आहे. लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार या योजनेचा विस्तार जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत महिला व बालकल्याणासाठी राखीव 3 टक्के निधीतून जिल्हा व तालुका स्तरापर्यंत करण्यात येईल. यामधून प्रत्येक जिल्ह्यात 500 पिंक ई-रिक्षा उपलब्ध करुन देण्यात येतील. त्याचप्रमाणे श्री ज्योतिबा मंदिर परिसर व त्याच्या आजुबाजूच्या डोंगराच्या परिसरातील गावांचा विकास आराखडा तयार करण्याच्या दृष्टिकोनातून नियोजित प्राधिकरणाची आवश्यकता आहे. यासंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरु असून श्री ज्योतिबा मंदिर व परिसर विकास उत्कर्ष प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार आहे. जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज हे वारकरी संप्रदायातील संतांचे मोठे गुरुबंधू मानले जातात. त्यांचे समाधीस्थळ असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे विकास आराखडा तयार करुन त्यास आवश्यक निधी देण्यात येणार आहे. यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद येथील शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था 1914 पासून कार्यरत असून ही संस्था 100 वर्षांहून अधिक काळ शिक्षणप्रसाराचे कार्य करीत आहे. या संस्थेद्वारा संचलित कोषटवार दौलतखान विद्यालय व गोधाजीराव मुखरे कनिष्ठ महाविद्यालय या संस्थेच्या इमारत बांधकाम व मूलभूत सोयीसुविधांकरिता 2 कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे.

# भोलेबाबाचा सेवक देव प्रकाश मधुकर याला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

नवी दिल्ली, प्रतिनिधी:

हाथरस सत्संग चेंगराचेंगरीत आतापर्यंत 123 भाविकांचा बळी गेला आहे. या चेंगराचेंगरी प्रकरणी उत्तरप्रदेश पोलिसांनी आयोजकांवर गुन्हा दाखल केला. या चेंगरीचेंगरीतील मुख्य आरोपी देव प्रकाश मधुकर याचा पोलीस शोध घेत होते, त्याला शुक्रवारी रात्री उशीरा दिल्लीतून अटक करण्यात आली. देव प्रकाश मधुकर याला दिल्लीतील उत्तम नगर परिसरातून अटक करण्यात आली. विशेष म्हणजे पोलिसांनी देव प्रकाश मधुकर याच्यावर एक लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. देव



प्रकाश मधुकर याच्या अटकेनंतर त्याला शनिवारी न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती यूपी पोलिसांनी दिली.

कोण आहे देव प्रकाश मधुकर : हाथरस सत्संग चेंगराचेंगरीत 123 भाविकांचा मृत्यू झाला, या प्रकरणी सूरजपाल उर्फ भोलेबाबाचा पोलीस शोध घेत आहेत. भोलेबाबाचा मुख्य सेवक म्हणून देव प्रकाश मधुकर हा काम करत होता. देव प्रकाश मधुकरनं उत्तर प्रदेश पोलीस आणि एसटीएफसमोर आत्मसमर्पण केलं, असा दावा भोलेबाबाचे वकील एपी सिंह यांनी केला आहे. देव प्रकाश मधुकर हा हृदयरोगानं ग्रस्त

**मंगळवारी उत्तर प्रदेशातील हाथरस इथं भोलेबाबाचा सत्संग संपल्यानंतर अचानक चेंगराचेंगरी झाली. यात 123 भाविकांचा मृत्यू झाला. या प्रकरणावरुन राजकारणही चांगलंच तापलं असून राजकीय पक्ष आरोप-प्रत्यारोप करत आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही हाथरस चेंगराचेंगरीतील पीडितांची भेट घेतली. उत्तर प्रदेश सरकारकडं पीडितांच्या कुटुंबीयांना लवकर मदत देण्याची मागणी केली. यावेळी राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षाच्या निधीतून मदत करण्यात येणार असल्याचं आश्वासन पीडित कुटुंबाना दिलं, अशी माहिती पीडितांनी दिली.**


असून त्याच्यावर दिल्लीतील रुग्णालयात उपचार सुरू असल्याचा दावाही वकील एपी सिंह यांनी केला आहे.

यूपी पोलीस देव प्रकाश मधुकर याचा शोध घेत होते. पोलिसांनी दिल्लीच्या नजफगढ उत्तम नगरातील रुग्णालयातून त्याला अटक केलं. मात्र देव प्रकाश मधुकरनं हातरस पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं आहे, असा दावा करण्यात येत आहे. हातरस पोलीस आरोपीची चौकशी करत असल्याचं सांगण्यात येत आहे.

# अल्कोहोल टेस्टसाठी थांबवलं, पठ्ठ्याने महिला पोलिसावर थेट पेट्रोल ओतलं

पुणे, प्रतिनिधी:

वाहतूक नियमन करणाऱ्या महिला पोलीस अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटवण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली आहे. शुक्रवारी सायंकाळी पाच वाजताच्या दरम्यान वाहतूक विभागाच्या विश्रामबाग कार्यालयात ही घटना घडली. याप्रकरणी संजय फकीरा साळवे याच्याविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. बुधवार चौकात ड्रंक अँड ड्राईव्हची कारवाई सुरू असताना हा प्रकार



घडला.

अटकेत असलेला आरोपी दारू पिऊन गाडी चालवत असल्याचा संशय आल्यानं त्याला ब्रीद एनालायझर टेस्टसाठी विश्रामबाग कार्यालयात आणलं गेलं. त्यावेळी त्यांना संबंधित पोलिसांशी वाद घालून त्यांना पेटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यावरून त्यांच्यात वाद झाला. एपीआय जानकर सावंत यांच्यासोबत हा प्रकार घडला. सुदैवानं आरोपीच्या हातातला लायटर पेटू न शकल्यानं पुढील दुर्घटना टळली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपाली भुजबळ बोलताना म्हणाल्या की, "शुक्रवारी संध्याकाळी ट्रॅफिक ब्रांचकडून बुधवार चौकात कारवाई सुरू होती. त्यावेळी आरोपी दुचाकीवरुन जात असताना पोलिसांना संशय आला. त्यामुळे पोलिसांनी त्याला थांबवलं. त्यावेळी आरोपी मद्यधुंद अवस्थेत असल्याचं सर्वांना आढळून आलं. त्यामुळे पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं आणि पुढच्या कारवाईसाठी पोलीस स्थानकात आणलं.

# बीडमध्ये सुस्साट बाईकवर रिल काढण्याचा नादात अपघात, एकाचा जागीच मृत्यू!



बीड, प्रतिनिधी:

सध्या सेल्फिचा ट्रेण्ड आहे. एखादे निसर्गरम्य ठिकाण दिसूदेत नाहीतर कोणी सेलिब्रिटी व्यक्तीची भेट असूदेत प्रत्येकजण हा क्षण सेल्फीच्या माध्यमातून कैद करण्याचा प्रयत्न करतो. पण सेल्फीचा हाच नाद कधीकधी जीवघेणा ठरू शकतो त्याची प्रचिती बीडमधील धक्कादायक घटनेतून मिळाली आहे. येथे दुकाचीकवरून प्रवास करत असताना सेल्फी काढण्याचा प्रयत्न केल्यामुळे एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अन्य एक जण गंभीर जखमी आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दुचाकीवर मागे बसलेला तुरण सेल्फी कॅमेऱ्याच्या माध्यमातून रिल काढत होता. बाईक वेगात चाललेली असताना तो मागे वळून पाहून कॅमेऱ्याला बोटांनी व्हिक्टरी साईन दाखवत होता. विशेष म्हणजे बाईक चालवत असलेला तरुणदेखील रिल तयार करण्यासाठी फोनमध्ये बघण्याचा प्रयत्न करत होता.

याचवेळी एका क्षणात त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. यात एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी झालाय. ही घटना राष्ट्रीय महामार्गावरील बीड बायपासवर घडली आहे.

# "सरकारी तिजोरीतून ११ कोटी देण्याची गरज काय?"; मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर वडेट्टीवारांचा सवाल

मुंबई, प्रतिनिधी:

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ च्या स्पर्धेत भारतीय संघाने जेतेपद पटकावलं. जगज्जेत्या संघावर गेल्या काही दिवसांपासून पूर्ण भारतातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. बीसीसीआयने टीम इंडियाला १२५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. त्याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी महाराष्ट्राच्या विधीमंडळात कर्णधार रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि यशस्वी जैस्वाल या भारतीय संघातील मुंबईकर खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय क्रिकेट संघासाठी ११ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले. मात्र आता सरकारी तिजोरीतून एवढं मोठं बक्षीस जाहीर केल्यामुळे विरोधकांनी नाराजी व्यक्त केली आहे. बीसीसीआयने भारतीय संघाला कोट्यवधि रुपये दिलेले असताना पुन्हा ११ कोटी देण्याची काय गरज? असा सवाल विरोधकांनी विचारला आहे.

भारतीय क्रिकेट संघाचा मुंबईकर कर्णधार रोहित शर्मा, सुर्यकूमार यादव, यशस्वी जयस्वाल, शिवम दुबे, गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांब्रे, संघ व्यवस्थापक अरूण कानडे यांचा आज विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात विशेष सत्कार करण्यात आला. विधानभवनात पहिल्यांदाच अशा प्रकारचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याआधी



भारतीय संघातील चार मुंबईकर खेळाडूंना प्रत्येकी १ कोटी रुपयांचे बक्षीस महाराष्ट्र सरकारने जाहीर केले होते. त्यानंतर विधीमंडळात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आणखी मोठी घोषणा केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय संघाला राज्य सरकारकडून ११ कोटींचे बक्षिस देण्यात येणार असल्याचे सांगितले. मात्र आता यावरुन राज्याच्या दोन्ही विरोधी पक्षांनी टीका केली आहे.

"भारतीय संघाने विश्वचषक जिंकला याचा सर्वांनाच आनंद झाला आहे. त्यांना कोट्यवधीची बक्षीसे जाहीर झाली आहेत. ऑस्ट्रेलियाचा संघ जेव्हा विश्वचषक जिंकतो, तेव्हा ते स्वतःच्या बॅगा उचलून घरी जातात पण भारतात तशी परिस्थिती नाही. भारतातील चाहते क्रिकेटपटूंना डोक्यावर घेतात. मुंबईच्या मरीन ड्राईव्हवर आपण पाहिलं की लाखोंच्या संख्येने चाहते रस्त्यावर उतरले होते. चाहत्यांच्या भावनेकडे पाहून मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली असावी," अशी खोचक टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

"सरकारी तिजोरीतून ११ कोटी देण्याची काही गरज नव्हती. मुंबईकर चार खेळाडूंना एक-एक कोटी देण्याची घोषणा झाली होतीच. मग इतर खेळाडूंना बक्षीस देण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. क्रिकेटपटूंना आधीच खूप पैसे मिळाले आहेत. क्रिकेटपटू पैशांसाठी नाही तर देशासाठी खेळतात, मग त्यांना पैसे का देत आहात? शेतकऱ्यांना जर मदत मिळत नसेल तर सरकारचा पर्दाफाश जनता करेल. क्रिकेट खेळाडूंना बीसीसीआयने १२५ कोटी दिले आहेत, तरीही सरकारी तिजोरीतून पैसे देण्याची गरज नव्हती. मात्र स्वतःची पाठ थोपटवून घेण्यासाठी हे बक्षीस दिले गेले.

# 108 रूग्णवाहिका सेवेमुळे 10 वर्षात मिळाला 1 कोटी रूग्णांना लाभ

मुंबई, प्रतिनिधी:

मुंबई : आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत 'डायल 108' ही रूग्णवाहिका सेवा अत्यंत महत्वाची ठरली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या या सेवेने राज्यातील नागरिकांची आरोग्य सेवा करीत तब्बल 10 वर्ष पूर्ण केले आहे. या 10 वर्षाच्या कालावधीत 108 रूग्णवाहिकेची सेवा रूग्णांना जीवनदान देणारी ठरली आहे. अशा या संजीवनी देणाऱ्या रूग्णवाहिका सेवेने राज्यात 1 कोटी 3 हजार 446 रूग्णांची विनामूल्य आरोग्य सेवा केली आहे.

कुणी आजारी असेल, अपघात झाला असेल किंवा वैद्यकीय सेवेची मदत असेल तर 108 रूग्णवाहिका सेवेसाठी तत्पर असते. आपत्कालीन आरोग्य सेवांसाठी 'एक-शून्य-आठ' हा विनामूल्य दूरध्वनी क्रमांक आहे.




"राज्यात कोणत्याही ठिकाणावरून मोबाईल अथवा दुरध्वनीवरून 108 क्रमांक डायल करताच वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत रूग्णांना विनामूल्य आणि वेळेत रूग्णवाहिका सेवा देण्यात येते. सेवा सुरू झाली तेव्हापासून, जून 2024 पर्यंत अपघाती घटनांमध्ये रूग्णवाहिकेमधून 5 लाख 22 हजार 682 रूग्णांना उपचारासाठी रूग्णालयात पोहचविण्यात आले आहे. तसेच आगीच्या घटनांमध्ये 29 हजार 253, हृदयरोगमध्ये 75 हजार 593, उंचावरून पडून जखमी झालेल्या 1 लाख 58 हजार 684, विषबाधा प्रकरणी 2 लाख 32 हजार 426, प्रसुतीवेळी 16 लाख 56 हजार 94, शॉक किंवा वीज पडून जखमी या घटनांमध्ये 6 हजार 949 रूग्णांना सेवा देण्यात आली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, सार्वजनिक आरोग्य विभाग व भारत विकास ग्रुपच्या (बीव्हीजी इंडिया) संयुक्त विद्यमाने ही सेवा अव्याहतपणे राज्यात ठिकठिकाणी चालविण्यात येत आहे. महाराष्ट्रात या सेवेची सुरूवात जानेवारी 2014 मध्ये झाली. राज्यात सध्या 937 रूग्णवाहिका असून सर्व रूग्णवाहिकेत पल्स ऑक्सिमीटर, मेडीकल ऑक्सिजन यंत्रणा सज्ज आहे. ही देशातील अविरत 24 तास डॉक्टर व अत्यावश्यक वैद्यकीय सुविधेसह असणारी एकमेव यंत्रणा आहे. राज्यात 108 रूग्णवाहिकेमध्ये 40 हजार 213 प्रसुती करण्यात येवून त्यांना सुखरूप सोडण्यात आले आहे. तसेच 4 हजार 34 रूग्णांना कृत्रिम श्वासोच्छवास (व्हेंटीलेटर) ची सुविधा देण्यात येवून त्यांचे प्राण वाचविण्यात आले आहे.

अशा प्रकारे राज्यात 1 कोटी 3 हजार 446 रूग्णांना आरोग्य सेवा 108 च्या माध्यमातून मिळाली आहे. महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा या नावाने असलेल्या 108 ही रूग्णवाहिका सेवा सुरू आहे.

याव्यतिरिक्त राज्यात नाशिक येथील महाकुंभमेळा कालावधीत 1 लाख 7 हजार 200 रूग्णांना सेवा दिली. महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या पंढरपूरच्या वारीमध्ये 2 लाख 89 हजार 646 आणि गणपती उत्सवात 4 हजार 684 रूग्णांना 108 ने सेवा दिली आहे. या सेवेमध्ये सुधारणा करण्यासाठी किंवा सेवेच्या समाधानाबाबत नागरिकांचा प्रतिसाद (फिडबॅक)देखील घेण्यात येतो. राज्यात सेवेबद्दल 6 लाख 74 हजार 542 प्रतिसाद प्राप्त झाले आहे.

# नरेंद्र मोदी देशातील भ्रष्ट लोकांचे सरदार, वायकरही भाजपाच्या वॉशिंग मशिनमधून स्वच्छ: नाना पटोले

नागपूर, प्रतिनिधी:

शिवसेना खासदार रविंद्र वायकर यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप असताना मुंबई पोलिसांनी त्यांना क्लिन चीट देणे म्हणजे भाजपाच्या वॉशिंगमशीन मधून वायकरांना स्वच्छ केल्याचे आणखी एक प्रकरण आहे. मोदी सरकार हे ईडी व सीबीआय या दोन कार्यकर्त्यांच्या मार्फत राजकारण कसे करते हे देशाने पाहिले आहे. अशी एखादी घटना समजू शकतो पण अनेक उदाहरणे आहेत, वायकर त्यातील एक प्रकरण आहे. नरेंद्र मोदी हे देशातील भ्रष्ट लोकांचे सरदार आहेत, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, वायकर प्रकरणावर फारसे



बोलण्यात काही अर्थ नाही. लोकसभा निवडणुकीआधी पक्ष बदलून ते सत्ताधारी पक्षाबरोबर गेले तेव्हाच त्यांनी सांगितले होते. त्यामुळे मुंबई पोलिसांनी त्यांना क्लिन चिट देऊन फाईल बंद केली यात नवल वाटण्यासारखे काही नाही, असे नाना पटोले म्हणाले.

पुण्यात महिला वाहतूक पोलिसावर पेट्रोल ओतून जाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याच्या घटनेवर संताप व्यक्त करत पटोले म्हणाले की, राज्यात कायदा सुव्यवस्था कुठे राहिली आहे? महाराष्ट्र पोलीसच सुरक्षित नाहीत ही परिस्थीती आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे फक्त घोषणा करतात कृती मात्र काहीच नाही. जेलमधील आरोपींना व्हीआयपी ट्रिटमेंट मिळते, ससून रुग्णालयात उपचाराच्यानावाखाली आरोपींना फाईव्हस्टार व्यवस्था दिली जाते. प्रशासन व पोलीस कुठे आहे हे कळत नाही. नागपूरमध्येही राम झुलावर मद्यधुंद कारचालकाने दोन मुलांना कारखाली चिरडून मारण्याची घटना झाली, ती केस कमजोर करण्यासाठी पोलिसांवर दबाव होता. त्यामुळे या आरोपींना लागलीच जामीन मिळाला. धनदांडग्या घरातील आरोपींना कसलीच भिती राहिली नाही म्हणूनच महिला पोलिसाला जाळण्याची हिम्मत होते असे पटोले म्हणाले.